भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# कामगार भरपाई अधिनियम, १९२३

**(१९२३ चा अधिनियम क्रमांक ८)**

[३१ ऑक्टोबर १९९६ रोजी यथाविद्यमान]

# The Workmen's Compensation Act, 1923

**(Act No. 8 of 1923)**

*[As in force on the 31st October 1996]*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००३

**[किंमत : रु. १०.००]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९६ रोजी यथाविद्यमान असलेला दि वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन अ‍ॅक्ट, १९२३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक १, दिनांक २२ ऑक्टोबर, १९९७ यात पृष्ठे ३ ते ३५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ ऑक्टोबर, १९९७.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Workmen's Compensation Act, 1923 as on the 31st October 1996 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 8, dated 22nd October 1997 on pages 3 to 35.

This authoritative taxt was published under the authority of the Precident under Section 2, Clause (a) of the Authoritative Text (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd October 1997.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India

## विशोधन अधिनियम आणि अनुकूलन आदेश यांची सूची

१. 'निरसन आणि विशोधन अधिनियम, १९२४' (१९२४ चा ७).

२ 'निरसन आणि विशोधन अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३७).

३. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९२६' (१९२६ चा २९).

४. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९२९' ( १९२९ चा ५).

५. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९३३' (१९३३ चा १५).

६. 'भारत शासन (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७.'

७. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९३७' (१९३७ चा ७).

८. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९३८' (१९३८ चा ९).

९. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा १३).

१०. 'कामगार भरपाई (दुसरे विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा ४२).

११. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९४२' (१९४२ चा १).

१२. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९४६' (१९४६ चा १).

१३. 'भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय अधिनियम आणि अध्यादेश यांचे अनुकूलन) आदेश, १९४८.'

१४. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०.'

१५. 'भाग व राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ३).

१६. 'विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६.'

१७. 'निरसन आणि विशोधन अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३६).

१८. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९५९' (१९५९ चा ८).

१९. 'निरसन आणि विशोधन अधिनियम, १९६०' (१९६० चा ५८).

२०. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ६४).

२१. 'केंद्रीय कामगार कायदे (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९७०' (१९७० चा ५१).

२२. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९७६' (१९७६ चा ६५).

२३. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९८४' (१९८४ चा २२).

२४. 'प्रत्यायोजित विधिविधान उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८५' (१९८६ चा ४).

२५. 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९९५' (१९९५ चा ३०).

---

# कामगार भरपाई अधिनियम, १९२३

## कलमांचा क्रम

### प्रकरण एक

**प्रारंभिक**

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.

### प्रकरण दोन

**कामगारांना भरपाई**

३. नियोक्त्याचे भरपाईबाबतचे दायित्व.
४. भरपाईची रक्कम.
४क. भरपाई देय असेल तेव्हा देणे आणि कसुरीबद्दल दंड.
५. परिगणना करून वेतन ठरविण्याची पद्धती.
६. पुनर्विलोकन.
७. अर्धमासिक प्रदानांचे संराशीकरण.
८. भरपाईचे वाटप.
९. भरपाईची रक्कम अभिहस्तांकित, जप्त किंवा प्रभारित करावयाची नाही.
१०. नोटीस व मागणी.
१०क. प्राणांतिक अपघातांच्या संबंधात नियोक्त्यांकडून विवरणपत्र मागविण्याची शक्ती.
१०ख. प्राणांतिक अपघातांची व गंभीर स्वरूपाच्या शारीरिक इजांची प्रतिवृत्ते.
११. वैद्यकीय तपासणी.
१२. संविदा करणे.
१३. नियोक्त्याला त्रयस्थ व्यक्तींविरुद्ध योजता येतील असे उपाय.
१४. नियोक्त्याची नादारी.
१४क. भरपाई हा नियोक्त्याने हस्तांतरित केलेल्या मत्तेवरील पहिला प्रभार असणे.
१५. नौकाधिपती आणि खलाशी यांच्या संबंधी विशेष उपबंध.
१५क. कप्तान आणि विमानांच्या कर्मचारीगणाचे इतर सदस्य यांच्या संबंधी विशेष उपबंध.
१५ख. परदेशी कंपन्यांतील कामगार आणि मोटार वाहन यांच्याशी संबंधित विशेष उपबंध.
१६. भरपाईसंबंधीची प्रतिवेदने.
१७. संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे.
१८. [निरसित.]
१८क. दंड.

### प्रकरण तीन

**आयुक्त**

१९. आयुक्तांकडे निर्देशन.
२०. आयुक्तांची नियुक्ती.
२१. कार्यवाहीचे स्थळ आणि ती वर्ग करणे.
२२. अर्जाचा नमुना.
२२क. प्राणांतिक अपघातांच्या प्रकरणी आणखी रक्कम जमा करण्यास फर्माविण्याची आयुक्ताची शक्ती.

२३. आयुक्तांच्या शक्ती व त्यांची कार्यपद्धती.

२४. पक्षकारांची उपस्थिती.

२५. पुरावा नोंदण्याची पद्धती.

२६. परिव्यय.

२७. प्रकरणे सादर करण्याची शक्ती.

२८. संमतिपत्रांची नोंदणी.

२९. संमतिपत्रांची नोंदणी करण्यास चुकल्याचा परिणाम.

३०. अपिले.

३०क. अपिलाचा निर्णय लागेपर्यंत विवक्षित प्रदाने रोखून ठेवणे.

३१. वसुली.

## प्रकरण चार

### नियम

३२. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

३३. [निरसित.]

३४. नियम प्रकाशित करणे.

३५. भरपाई म्हणून दिलेले पैसे पाठवून देण्याबाबत इतर देशांबरोबर केलेल्या व्यवस्था अमलात आणण्यासाठी नियम.

३६. केंद्र शासनाने केलेले नियम संसदेपुढे ठेवणे.

अनुसूची पहिली :—

अनुसूची दुसरी :—

अनुसूची तिसरी :—

अनुसूची चौथी :—

# कामगार भरपाई अधिनियम, १९२३

## (१९२३ चा अधिनियम क्रमांक ८) [1]

(३१ ऑक्टोबर, १९९६ रोजी यथाविद्यमान)

[ ५ मार्च, १९२३ ]

विशिष्ट वर्गातील नियोक्त्यांनी आपल्या कामगारांना अपघातामुळे झालेल्या इजेबद्दल भरपाई देण्याबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, विशिष्ट वर्गातील नियोक्त्यांनी आपल्या कामगारांना अपघातामुळे झालेल्या इजेबद्दल भरपाई देण्याबाबत उपबंध करणे समयोचित आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमाला 'कामगार भरपाई अधिनियम, १९२३' असे म्हणता येईल. — संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

[2][(२) त्याचा विस्तार [3]* * * संपूर्ण भारतभर आहे.]

(३) तो १ जुलै १९२४ रोजी अंमलात येईल.

२. (१) या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— — व्याख्या.

[4]* * * * * *

(ख) "आयुक्त" याचा अर्थ, कलम २० खाली नियुक्त केलेला श्रमिक भरपाई आयुक्त, असा आहे;

(ग) "भरपाई" याचा अर्थ, या अधिनियमाद्वारे उपबंधित करण्यात आल्याप्रमाणे भरपाई, असा आहे;

[5][(घ) "अवलंबित व्यक्ती" याचा अर्थ, मृत कामगाराचे पुढीलपैकी कोणतेही नातेवाईक, असा आहे, ते असे :—

(एक) विधवा, अज्ञान [6][औरस किंवा दत्तक मुलगा] आणि अविवाहित [6][औरस किंवा दत्तक मुलगी] किंवा विधवा आई; आणि

(दोन) कामगाराच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या कमाईवर संपूर्णत: अवलंबून असल्यास, वयाची १८ वर्षे झालेली असून विकल असणारा मुलगा किंवा मुलगी ;

(तीन) कामगाराच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या कमाईवर संपूर्णत: किंवा अंशत: अवलंबून असल्यास,—

(क) विधुर,

(ख) आई-वा-बाप—विधवा आई वगळून,

(ग) अज्ञान, [7][औरस किंवा दत्तक मुलगा], अविवाहित [7][अनौरस किंवा दत्तक मुलगी] अथवा विवाहित व अज्ञान असल्यास किंवा विधवा व अज्ञान असल्यास औरस किंवा अनौरस मुलगी,

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९२२—भाग पाच, पृ. ३१३ आणि संयुक्त समितीच्या अहवालाकरिता पहा—कित्ता, १९२३—भाग पाच, पृ. ३७.

हा अधिनियम 'वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१' (१९४१ चा ४) याद्वारे वऱ्हाडवर, १९६२ चा विनियम १२-कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीव यांवर, १९६३ चा विनियम ६-कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे दादरा व नगरहवेली यांवर, १९६३ चा विनियम ७-कलम ३ व पहिली अनुसूची यांद्वारे पाँडिचेरीवर आणि १९६५ चा विनियम ८-कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमिनदिवी बेटांवर विस्तारित करण्यात आला आणि तसेच 'खोंडमाळ विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ४) कलम ३ व अनुसूची यांद्वारे खोंडमाळ जिल्ह्यात आणि 'अंगुल विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ५) कलम ३ व अनुसूची यांद्वारे अंगुल जिल्ह्यात अंमलात आल्याचे घोषित करण्यात आले.

हा अधिनियम बंगालला लागू करताना 'बेंगॉल टाऊटस ॲक्ट, १९४२' (१९४२ चा बंगाल अधिनियम ५) आणि 'कामगार भरपाई (बंगाल विशोधन) अधिनियम, १९४२' (१९४२ चा बंगाल अधिनियम ६) याद्वारे विशोधित करण्यात आला. हा अधिनियम सिक्कीम राज्याला १ नोव्हेंबर, १९८६ पासून लागू करण्यात आला. पहा जीएसआर. ५२९ (इ) दि. ३० डिसेंबर, १९८६.

'शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१' (१९६१ चा ५९) याखालील शिकाऊ उमेदवारांना हा अधिनियम लागू करताना त्या अधिनियमाचे कलम १६ व अनुसूची यांद्वारे यात बदल केला आहे.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ पोटकलमाऐवजी घातले.

३. १९६१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग ख राज्ये खेरीजकरून" याऐवजी घातलेले "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द १९७० चा अधिनियम ५१-कलम २ व अनुसूची यांद्वारे गाळले. (१ सप्टेंबर, १९७१ रोजी व तेव्हापासून).

४. १९५९ चा अधिनियम ८, कलम २ द्वारे खंड (क) गाळला (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे पूर्वीच्या खंडाऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

६. १९९५ चा अधिनियम ३०, कलम २ (क) (एक) (एक) द्वारे घातले.

७. वरील अधिनियमाच्या कलम २ (क) (एक) (दोन) द्वारे घातले.

(घ) अज्ञान भाऊ किंवा अविवाहित बहीण किंवा अज्ञान असल्यास, विधवा बहीण,
(ङ) विधवा सून,
(च) त्याच्या अगोदर मरण पावलेल्या मुलाचे अज्ञान अपत्य,
(छ) त्याच्या अगोदर मरण पावलेल्या मुलीच्या अज्ञान अपत्यांच्या आई-बापांपैकी कोणीही जिवंत नसतील तर असे अपत्य,
(ज) कामगाराचे आई-बाप जिवंत नसतील तर पैतृक आजा/आजी ;]

[1][**स्पष्टीकरण.**—उपखंड (दोन) आणि उपखंड (तीन) च्या बाब (च) आणि (छ) च्या प्रयोजनार्थ, मुलगा, मुलगी किंवा मूल यांच्या संदर्भामध्ये अनुक्रमे दत्तक मुलगा, मुलगी, किंवा मूल यांचा समावेश आहे.]

(ङ) "नियोक्ता" यामध्ये, कोणताही व्यक्तिसंघ—मग तो नियमित असो किंवा नसो—आणि नियोक्त्याचा कोणताही व्यवस्थापन अभिकर्ता आणि मृत नियोक्त्याचा वैध प्रतिनिधी यांचा, आणि कामगाराने ज्या व्यक्तीशी नोकरीचा किंवा शिकाऊ उमेदवारीचा करार केला आहे त्या व्यक्तीने त्या कामगाराची सेवा अन्य व्यक्तीला तात्पुरती उसनवार दिलेली असेल किंवा मोलाने दिलेली असून तो कामगार अशा अन्य व्यक्तीसाठी काम करीत असेल तेव्हा, त्या व्यक्तीचा समावेश होतो ;

(च) "व्यवस्थापन अभिकर्ता" याचा अर्थ, जी व्यक्ती अन्य व्यक्तीचा प्रतिनिधी म्हणून अशा अन्य व्यक्तीचा उदीम किंवा धंदा चालविण्यासाठी नियुक्त केलेली असेल किंवा कार्य करत असेल अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे, पण त्यामध्ये नियोक्त्याचा ताबेदार असणाऱ्या एखाद्या कारभाऱ्याचा समावेश होत नाही ;

[2][(चच) "अज्ञान व्यक्ती" याचा अर्थ, जिच्या वयाला अठरा वर्षे झालेली नाहीत अशी व्यक्ती, असा आहे ;]

(छ) "आंशिक निःसमर्थता" याचा अर्थ, ज्या बाबतीत निःसमर्थता तात्पुरत्या स्वरूपाची असते त्या बाबतीत, ज्यामुळे निःसमर्थता उद्‌भवली त्या अपघाताच्या वेळी कामगार ज्या कोणत्याही कामधंद्यात होता त्या कामधंद्यातील त्याची अर्थार्जनक्षमता ज्या निःसमर्थतेमुळे कमी होते अशी निःसमर्थता आणि निःसमर्थता कायम स्वरूपाची असते त्या बाबतीत, त्या वेळी तो जो कामधंदा पत्करण्यास सक्षम होता अशा प्रत्येक प्रकारच्या कामधंद्यातील त्याची अर्थार्जनक्षमता ज्या निःसमर्थतेमुळे कमी होते अशी निःसमर्थता, असा आहे. परंतु, [3][पहिल्या अनुसूचीच्या दुसऱ्या भागामध्ये] विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक इजेचे पर्यवसान कायमच्या आंशिक निःसमर्थतेमध्ये होते, असे मानण्यात येईल;

(ज) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(झ) "अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ वैद्यक व्यवसायींची नोंदवही ठेवण्याबाबत उपबंध करणारा कोणताही [4][केंद्रीय अधिनियम, प्रांतीय अधिनियम किंवा एखाद्या [5][राज्य] विधानमंडळाचा अधिनियम] याखाली [6]* * * नोंदणी केलेली कोणतीही व्यक्ती किंवा जेथे असा लगतपूर्वी उल्लेखिलेला कोणताही अधिनियम अंमलात नाही अशा कोणत्याही क्षेत्रामध्ये, राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी असल्याचे जाहीर केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

[7]* * * * * * * * * *

(ट) "खलाशी" याचा अर्थ, कोणत्याही [8]* * * जहाजावरील नाविकगणापैकी असणारी कोणतीही व्यक्ती, असा आहे, पण त्यामध्ये [9][त्या] जहाजाच्या नौकाधिपतीचा समावेश होत नाही ;

(ठ) "संपूर्ण निःसमर्थता" याचा अर्थ, ज्या निःसमर्थतेमुळे,—मग ती तात्पुरत्या स्वरूपाची असो किंवा कायम स्वरूपाची असो,—एखादा कामगार, अशी निःसमर्थता ज्या अपघातामुळे उद्‌भवली त्या अपघाताच्या वेळी तो जे जे काम पार पाडण्यास समर्थ होता ती सगळी कामे पार पाडण्यास असमर्थ होतो ती निःसमर्थता, असा आहे :

---

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम २ (क) (एक) (तीन) द्वारे घातले.
२. १९५९ चा अधिनियम ८, कलम २ द्वारे घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).
३. १९६२ चा अधिनियम ६४, कलम २ द्वारे "पहिल्या अनुसूचीमध्ये" या शब्दांऐवजी घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).
४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "मध्यवर्ती विधानमंडळाचा अधिनियम किंवा भारतातील एखाद्या प्रांतामध्ये कोणतेही विधानमंडळ असल्यास त्याचा अधिनियम" या शब्दांऐवजी घातले.
५. अनुकूलन आदेश (क्रमांक ३), १९५६ द्वारे "भाग क राज्याच्या किंवा भाग ख राज्याच्या" याऐवजी घातले.
६. १९५९ चा अधिनियम ८, कलम २ द्वारे विवक्षित शब्द गाळले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).
७. १९३३ चा अधिनियम १५, कलम २ द्वारे खंड (ञ) गाळला.
८. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "नोंदलेल्या" हा शब्द गाळला.
९. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "अशा कोणत्याही" या शब्दांऐवजी घातले.

[1][परंतु, पहिल्या अनुसूचीच्या पहिल्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक इजेमुळे, किंवा त्या अनुसूचीच्या दुसऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही इजांचा एकत्रितपणे विचार केला असता उक्त दुसऱ्या भागामध्ये त्या इजांच्या उल्लेखासमोर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अर्थार्जन-क्षमतेत झालेल्या हानीची एकंदर टक्केवारी शंभर टक्के किंवा त्याहून अधिक असते तेव्हा त्यामुळे, कायमची संपूर्ण नि:समर्थता उद्‌भवते असे मानण्यात येईल ;]

(ड्) "वेतन" यामध्ये, प्रवासभत्ता अथवा कोणत्याही प्रवासाविषयक सवलतीचे मूल्य किंवा नियोक्त्याने कोणत्याही पेन्शन निधीपोटी किंवा भविष्य निधीपोटी दिलेले अंशदान अथवा कामगारांच्या कामधंद्याच्या स्वरूपामुळे त्याच्यावर करावा लागणारा कोणताही विशेष खर्च भागविण्यासाठी कामगाराला दिलेली रक्कम वगळता, पैशांच्या स्वरूपात जिचे मोल ठरवता येण्यासारखे आहे, अशी कोणतीही विशेष सवलत किंवा असा लाभ यांचा समावेश होतो ;

(ढ्) "कामगार" याचा अर्थ, जी कोणी व्यक्ती (जिचा रोजगार नैमित्तिक स्वरूपाचा आहे आणि नियोक्त्याच्या उदीम किंवा धंदा याच्या प्रयोजनांसाठी नव्हे तर अन्यथा, जी कामावर ठेवली आहे अशा व्यक्तीहून अन्य)—

(एक) [2][रेल्वे अधिनियम, १९८९ (१९८९ चा २४) याच्या कलम २ च्या खंड (३४) मध्ये] व्याख्या केल्याप्रमाणे रेल्वे कर्मचारी असून एखाद्या रेल्वेच्या कोणत्याही प्रशासकीय, जिल्हा किंवा उपविभागीय कार्यालयात कायमची नेमलेली नाही आणि दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा कोणत्याही पदी नेमलेली नाही, किंवा

[3][(एक) (क्) नौकाधिपती, खलाशी किंवा जहाजाच्या नाविकगणाचे इतर सदस्य,

(ख्) कप्तान किंवा विमानाच्या कर्मचारीगणाचे इतर सदस्य,

(ग्) मोटार वाहनाच्या संबंधात चालक, मदतनीस, यांत्रिक, स्वच्छक किंवा इतर कोणत्याही नात्याने भरती केलेली व्यक्ती,

(घ्) एखाद्या कंपनीने परदेशात काम करण्यासाठी भरती केलेली,

आणि अनुसूची दोनमध्ये निर्देशिल्याप्रमाणेच्या कोणत्याही नात्याने भारताबाहेर नोकरीस लावलेली व्यक्ती आणि भारतामध्ये नोंदलेले जहाज, विमान किंवा मोटार वाहन, किंवा प्रकरणपरत्वे, कंपनी, किंवा; ]

(दोन) दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा कोणत्याही पदी [4]* * * [5]* * * * नेमलेली आहे,

ती व्यक्ती, असा आहे—मग तिच्या नोकरीची संविदा हा अधिनियम पारित होण्यापूर्वी केलेली असो वा नंतर केलेली असो आणि अशी संविदा व्यक्त असो वा उपलक्षित असो, तोंडी असो वा लेखी असो; पण त्यामध्ये [6][संघराज्याच्या सशस्त्र सेनेचा] [7]* * * सदस्य या नात्याने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होत नाही; आणि इजा पोचलेल्या कामगाराच्या कोणत्याही उल्लेखामध्ये, जर असा कामगार मृत्यू पावला असेल तर त्याच्या अवलंबित व्यक्तींच्या किंवा त्यांपैकी कोणत्याही व्यक्तीच्या उल्लेखाचा समावेश होतो.

(२) स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा [8][शासनाच्या वतीने कार्य करणाऱ्या] कोणत्याही विभागाच्या शक्ती वापरणे आणि कर्तव्ये पार पाडणे हा, या कलमाच्या प्रयोजनार्थ, विरुद्ध उद्देश असल्याचे दिसून येत नसेल तर, अशा प्राधिकरणाचा किंवा विभागाचा उदीम किंवा धंदा असल्याचे मानले जाईल.

[9][(३) एखादा व्यवसाय धोक्याचा असल्याविषयी केंद्र शासन किंवा राज्य शासन यांची खात्री पटली असून त्या व्यवसायात कामाला असलेला कोणताही व्यक्तिवर्ग अनुसूचीमध्ये जादा दाखल करावयाचा झाल्यास, केंद्र शासन किंवा राज्य शासन तसे करण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, किमान तीन महिन्यांची नोटीस देऊन, नंतर तशाच अधिसूचनेद्वारे त्याप्रमाणे भर घालू शकेल आणि तद्नंतर या अधिनियमाचे उपबंध, केंद्र शासनाने काढलेल्या अधिसूचनेसंबंधात, हा अधिनियम ज्या राज्यक्षेत्राला लागू असेल त्या राज्यक्षेत्राला किंवा राज्य शासनाने काढलेल्या अधिसूचनेसंबंधात त्या राज्यात अशा व्यक्तिवर्गांना लागू होतील :

---

१. १९६२ चा अधिनियम ६४, कलम २ द्वारे मूळ परंतुकाऐवजी घातले (१ फेब्रुवारी, १९६२ रोजी व तेव्हापासून).

२. १९९५ चा अधिनियम ३०, कलम २ (क्) (दोन) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ (क्) (दोन) (दोन) द्वारे घातले.

४. १९३३ चा अधिनियम १५, कलम २ द्वारे "अंगमेहनतीच्या कामावरील किंवा" हे शब्द गाळले.

५. १९८४ चा अधिनियम २२, कलम २ द्वारे मूळ मजकूर गाळला (१ जुलै, १९८४ रोजी व तेव्हापासून).

६. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "हिज मॅजेस्टीच्या नौसेनेचा, भूसेनेचा किंवा वायुसेनेचा" याऐवजी घातले.

७. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "किंवा रॉयल इंडियन मरीन सर्व्हिसचा" हे शब्द गाळले.

८. वरील आदेशाद्वारे "शासनाच्या" या शब्दाऐवजी घातले.

९. १९९५ चा अधिनियम ३०, कलम २ (ख्) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी घातले.

परंतु, अशी भर घालताना, केंद्र शासन किंवा प्रकरणपरत्वे, राज्य शासन, या अधिनियमाचे उपबंध अशा व्यक्तिवर्गांना फक्त विनिर्दिष्ट इजांच्या संबंधात लागू होतील, असे निदेश देऊ शकेल.]

## प्रकरण दोन

### कामगारांना भरपाई

नियोक्त्याचे भरपाई बाबतचे दायित्व.

३. (१) जर कामगाराला, त्याच्या कामधंद्यामुळे आणि त्याच्या ओघात उद्भवलेल्या अपघाताने शारीरिक इजा पोहोचली तर, त्याचा नियोक्ता या प्रकरणाच्या उपबंधानुसार भरपाई देण्यास दायी होईल :

परंतु,—

(क) ज्या इजेमुळे कामगाराला [1][तीन] दिवसांपेक्षा अधिक काळ संपूर्णत: किंवा आंशिक नि:समर्थता येत नाही अशा कोणत्याही इजेच्या संबंधात ;

(ख) (एक) कामगार त्यावेळी मद्याच्या किंवा अंमली पदार्थांच्या नशेत असणे, किंवा

(दोन) कामगारांची सुरक्षितता साधण्यासाठी स्पष्टपणे दिलेला आदेश किंवा स्पष्टपणे केलेला नियम कामगाराने बुद्धिपुरस्सर न पाळणे, किंवा

(तीन) कामगारांची सुरक्षितता साधण्यासाठी ज्याची तरतूद केली असल्याचे आपणास माहीत आहे, असे कोणतेही सुरक्षा साधन किंवा अन्य साधन बुद्धिपुरस्सर काढून टाकणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे,

यांच्याशी ज्याचा कारणसंबंध प्रत्यक्षपणे जोडता येण्यासारखा आहे अशा अपघातामुळे [2][घडून आलेल्या ज्या इजेचे पर्यवसान मृत्यूत [3][किंवा कायमच्या संपूर्ण नि:समर्थतेत] झालेले नाही अशा] कोणत्याही इजेच्या संबंधात,

[4]* * * * *

—नियोक्ता दायी असणार नाही.

[5][(२) जर तिसऱ्या अनुसूचीच्या भाग क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कामधंद्यात असलेल्या कामगाराला त्या कामधंद्यामुळे विशेषेकरून उद्भवणारा व्यवसायजन्य रोग म्हणून त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही रोग जडला, अथवा जर एखादा कामगार, ज्याच्या नोकरीत तिसऱ्या अनुसूचीच्या भाग ख मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही कामधंदा किमान सहा महिने इतक्या सलग कालावधीत (या कालावधी-मध्ये त्याच प्रकारच्या कामधंद्यात अन्य कोणत्याही नियोक्त्याकडे केलेल्या नोकरीचा कालावधी समाविष्ट असणार नाही) करत होता त्या नियोक्त्याकडे नोकरीला असताना त्याला त्या कामधंद्यामुळे विशेषेकरून उद्भवणारा व्यवसायजन्य रोग म्हणून विनिर्दिष्ट केलेला रोग जडला, अथवा जर एखादा कामगार तिसऱ्या अनुसूचीच्या भाग ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कामधंद्यात एक किंवा त्याहून अधिक नियोक्त्यांकडे केंद्र शासन अशा प्रत्येक कामधंद्याच्या संबंधात विनिर्दिष्ट करील तितक्या सलग कालावधीत नोकरीला असताना, त्याला त्या कामधंद्यामुळे विशेषेकरून उद्भवणारा व्यवसायजन्य रोग म्हणून विनिर्दिष्ट केलेला रोग जडला तर, असा रोग जडणे ही या कलमाच्या अर्थानुसार अपघातामुळे झालेली इजा असल्याचे मानण्यात येईल आणि विरुद्ध शाबीत झाले नाही तर, तो अपघात त्या कामधंद्यामुळे आणि त्याच्या ओघात उद्भवला असल्याचे मानले जाईल :

[6][परंतु, जर—

(क) एखादा कामगार तिसऱ्या अनुसूचीच्या भाग ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कामधंद्यात एका किंवा त्याहून अधिक नियोक्त्यांकडे नोकरीला असताना, त्याला त्या कामधंद्यामुळे विशेषेकरून उद्भवणारा व्यवसायजन्य रोग म्हणून त्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला रोग ज्या सलग कालावधीच्या दरम्यान जडला तो कालावधी त्या कामधंद्याबाबत या पोटकलमाखाली विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपेक्षा कमी आहे; आणि

(ख) तो रोग त्या कामधंद्यामुळे आणि त्याच्या ओघात उद्भवला आहे,

असे शाबीत झाले तर, असा रोग जडणे ही या कलमाच्या अर्थानुसार अपघातामुळे झालेली इजा असल्याचे मानले जाईल :

---

१. १९५९ चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे "सात" या शब्दाऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

२. १९३३ चा अधिनियम १५, कलम ३ द्वारे "कामगाराला होणाऱ्या" या शब्दाऐवजी घातले.

३. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ३ (क) द्वारे घातले.

४. १९२९ चा अधिनियम ५, कलम २ द्वारे "किंवा" हा शब्द व खंड (ग) गाळला.

५. १९५९ चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे मूळ पोटकलमे (२) व (३) यांऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

६. १९६२ चा अधिनियम ६४, कलम ३ द्वारे घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

परंतु आणखी असे की, ज्या कामगाराने, तिसऱ्या अनुसूचीच्या भाग ख मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कामधंद्यात कोणत्याही नियोक्त्याकडे अथवा त्याच अनुसूचीच्या भाग ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कामधंद्यात एका किंवा त्याहून अधिक नियोक्त्यांकडे, त्या कामधंद्याबाबत या पोट-कलमाखाली विनिर्दिष्ट केलेल्या सलग कालावधीत नोकरी केली आहे त्या कामगारला अशी नोकरी समाप्त झाल्या-नंतर, त्या कामधंद्यामुळे विशेषेकरून उद्‌भवणारा व्यवसायजन्य रोग म्हणून उक्त भाग ख किंवा, प्रकरण-परत्वे, भाग ग यांमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही रोग जडला आणि असा रोग त्या कामधंद्यामुळे उद्‌भवला असे शाबीत झाले तर, तो रोग जडणे ही या कलमाच्या अर्थानुसार अपघातामुळे झालेली इजा असल्याचे मानले जाईल.]

[१][ (२क) तिसऱ्या अनुसूचीच्या भाग ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कामधंद्यात असलेल्या कामगाराला जर, त्या कामधंद्यामुळे विशेषेकरून उद्‌भवणारा जो व्यवसायजन्य रोग जडणे ही या कलमाच्या अर्थानुसार अपघातामुळे झालेली इजा असल्याचे मानले जाते असा कोणताही व्यवसायजन्य रोग जडला आणि असा कामधंदा त्याने एकाहून अधिक नियोक्त्यांकडे केला असेल तर, असे सर्व नियोक्ते परिस्थिती-नुरूप आयुक्ताला योग्य वाटेल तितक्या प्रमाणात भरपाई देण्यास दायी होतील.]

(३) तिसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामधंद्यांच्या उल्लेखांमध्ये कोणत्याही वर्णनाचा कामधंदा अधिक समाविष्ट करावयाचा झाल्यास, [२][केंद्र शासन किंवा राज्य शासन] तसे करण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल तीन महिन्यांहून कमी नाही इतक्या मुदतीची नोटीस **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे देऊन नंतर तशाच अधिसूचनेद्वारे त्याप्रमाणे भर घालू शकेल आणि याप्रमाणे अधिक समाविष्ट केलेल्या कामधंद्याच्या बाबतीत या कलमाच्या प्रयोजनार्थ, कोणते रोग त्या त्या कामधंद्यांमुळे विशेषेकरून उद्‌भवणारे व्यवसायजन्य रोग म्हणून मानले जातील ते विनिर्दिष्ट करील, आणि तद्नंतर पोटकलम (२) चे उपबंध, [३][केंद्र शासनाने काढलेल्या अधिसूचनेसंबंधात, हा अधिनियम लागू होतो अशा राज्यक्षेत्रांमध्ये किंवा राज्य शासनाने काढलेल्या अधिसूचनेच्या बाबतीत राज्यात] जणू काही असे रोग त्या कामधंद्यांमुळे विशेषेकरून उद्‌भवणारे व्यवसायजन्य रोग म्हणून या अधिनियमाद्वारे जाहीर करण्यात आलेले असावेत त्याप्रमाणे [४][ * * * लागू होतील.]

(४) [५][पोटकलमे (२), (२क)] आणि (३) यांद्वारे उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, कामगाराला कोणत्याही रोगाच्या संबंधात, त्याच्या कामधंद्यामुळे आणि त्याच्या ओघात उद्‌भवणाऱ्या अपघाताने झालेल्या विनिर्दिष्ट इजेशी त्या रोगाचा कारणसंबंध [६]* * * प्रत्यक्षपणे जोडता येण्यासारखा नसेल तर, कोणतीही भरपाई प्रदेय होणार नाही.

(५) एखाद्या कामगाराने कोणत्याही इजेच्या संबंधात नियोक्त्याविरूद्ध किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीविरूद्ध दिवाणी न्यायालयात नुकसानीचा दावा दाखल केला असेल तर, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे त्याला भरपाई मिळण्याबाबत कोणताही अधिकार प्रदान होतो, असे मानले जाणार नाही ; आणि—

(क) जर त्याने आयुक्ताकडे कोणत्याही इजेच्या संबंधात भरपाईची मागणी दाखल केली असेल ; किंवा

(ख) जर या अधिनियमाच्या उपबंधानुसार इजेच्या संबंधात भरपाई देण्याचे उपबंधित करणारे संमतिपत्र कामगार आणि त्याचा नियोक्ता यांच्या दरम्यान झाले असेल तर,

त्या इजेच्या संबंधात कामगाराला कोणत्याही न्यायालयात नुकसानीचा दावा चालवता येणार नाही.

[७][४. (१) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, भरपाईची रक्कम पुढीलप्रमाणे असेल, ती अशी :— भरपाईची रक्कम.

(क) इजेमुळे मृत्यू घडून आलेला असेल तर : मृत कामगाराच्या मासिक वेतनाच्या [८][पन्नास] टक्क्यांइतक्या रकमेस संबंधित गुणकाद्वारे गुणून येणाऱ्या रकमेइतकी रक्कम ;

किंवा

[८][पन्नास] हजार रुपये,

यांपैको जी अधिक असेल ती रक्कम ;

---

१. १९६२ चा अधिनियम ६४, कलम ३ द्वारे मूळ पोटकलम (२क) या ऐवजी घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

२. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ३ (ख) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख) (दोन) द्वारे घातले.

४. १९७० चा अधिनियम ५१, कलम २ व अनुसूची यांद्वारे विवक्षित शब्द गाळले.

५. १९५९ चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे "पोटकलम (२)" या शब्दाऐवजी हे शब्द घातले.

६. १९३३ चा अधिनियम १५, कलम ३ द्वारे "सर्वस्वी आणि" हे शब्द गाळले.

७. १९८४ चा अधिनियम २२, कलम ३ द्वारे मूळ कलम ४ ऐवजी घातले (१ जुलै, १९८४ रोजी व तेव्हापासून).

८. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ४ (क) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(ख) इजेमुळे कायमची संपूर्ण नि:समर्थता उद्भवलेली असेल तर : इजा झालेल्या कामगाराच्या मासिक वेतनाच्या [1][साठ] टक्क्यांइतक्या रकमेस संबंधित गुणकाने गुणून येणाऱ्या रकमेइतकी रक्कम ; किंवा

[1][साठ] हजार रुपये,

यांपैकी जी अधिक असेल ती रक्कम;

**स्पष्टीकरण एक.**—खंड (क) आणि खंड (ख) च्या प्रयोजनार्थ, कामगाराच्या संदर्भात, " संबंधित गुणक " याचा अर्थ, अनुसूची चारच्या दुसऱ्या स्तंभात, त्या अनुसूचीच्या पहिल्या स्तंभातील नोंदीसमोर विनिर्दिष्ट केलेला आणि भरपाईची रक्कम देय होण्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या, त्या कामगाराच्या वाढदिवसाच्या तारखेस त्याच्या वयाच्या पूर्ण वर्षाइतकी संख्या दर्शविणारा गुणक, असा आहे;

**स्पष्टीकरण दोन.**—ज्या कामगाराचे मासिक वेतन [2][दोन हजार रुपयांहून] अधिक आहे त्याच्या बाबतीत, खंड (क) आणि खंड (ख) च्या प्रयोजनार्थ, त्याचे मासिक वेतन फक्त [2][दोन हजार रुपये] असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) इजेमुळे कायमची आंशिक नि:समर्थता आलेली असेल तर : (एक) पहिल्या अनुसूचीच्या दुसऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इजेच्या संबंधात, कायमच्या संपूर्ण नि:समर्थतेबाबत प्रदेय होऊ शकेल अशी भरपाईची जितकी टक्केवारी, त्या इजेमुळे अर्थार्जनक्षमतेच्या झालेल्या हानीची टक्केवारी म्हणून त्यात विनिर्दिष्ट केलेली आहे, अशी टक्केवारी, आणि

(दोन) पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही इजेच्या संबंधात, कायमच्या संपूर्ण नि:समर्थतेबाबत प्रदेय होणाऱ्या भरपाईची जितकी टक्केवारी त्या इजेमुळे (अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने निर्धारित केलेल्या) अर्थार्जनक्षमतेच्या कायमच्या झालेल्या हानीशी प्रमाणशीर असेल, अशी टक्केवारी.

**स्पष्टीकरण एक.**—जेव्हा एकाच अपघातामुळे एकाहून अधिक इजा पोहोचल्या असतील तेव्हा, या शीर्षाखाली प्रदेय असलेली भरपाईची रक्कम एकत्रित केली जाईल, पण ही रक्कम, त्या इजांमुळे कायमची संपूर्ण नि:समर्थता आली असती तर जितकी रक्कम प्रदेय झाली असती तितक्या रकमेपेक्षा कोणत्याही बाबतीत अधिक होता कामा नये ;

**स्पष्टीकरण दोन.**—उपखंड (दोन) च्या प्रयोजनार्थ, अर्थार्जन क्षमतेची हानी निर्धारित करताना, अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी, अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेगवेगळ्या इजांच्या संबंधात अर्थार्जन क्षमतेच्या हानीची टक्केवारी लक्षात घेईल ;

(घ) एखाद्या इजेमुळे तात्पुरती नि:समर्थता आली असेल—मग ती संपूर्णत: असो, किंवा आंशिक असो—तर : पोटकलम (२) च्या उपबंधांना अनुसरुन त्या कामगाराच्या मासिक वेतनाच्या पंचवीस टक्क्यांइतक्या रकमेचे अर्धमासिक प्रदान.

[3][(१क) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, भारताबाहेर घडलेल्या अपघाताच्या बाबतीत कामगाराला देय असलेली भरपाईची रक्कम ठरवताना, आयुक्त, कोणतीही असल्यास, ती रक्कम अपघात ज्या देशात घडला असेल त्या देशाच्या कायद्यास अनुसरून कामगारास दिलेली भरपाईची रक्कम, कोणतीही असल्यास, विचारात घेईल, आणि त्याने ठरविलेल्या रकमेतून, त्या देशाच्या कायद्यास अनुसरून कामगाराला दिलेली भरपाईची रक्कम वजा करील.]

(२) पोटकलम (१) च्या खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेले अर्धमासिक प्रदान हे,—

(एक) अशी नि:समर्थता अठ्ठावीस दिवस किंवा त्याहून अधिक काळ टिकून राहते तेव्हा नि:समर्थता आल्याच्या दिनांकापासून, किंवा

(दोन) अशी नि:समर्थता अठ्ठावीस दिवसांपेक्षा कमी काळ टिकून राहते तेव्हा, नि:समर्थता आल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांचा प्रतीक्षा कालावधी संपल्यानंतर सोळाव्या दिवशी आणि त्यानंतर नि:समर्थता चालू असेतोपर्यंतचा काळ किंवा पाच वर्षे इतका काळ यांपैकी जो कमी असेल त्या काळात अर्ध्या महिन्यागणिक प्रदेय होईल :

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ४ (क) (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ४ (क) (तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ख) द्वारे घातले.

परंतु,—

(क) कामगार ज्याला हक्कदार आहे अशी कोणतीही ठोक रक्कम किंवा पहिले अर्ध-मासिक प्रदान मिळण्यापूर्वी कामगाराला निःसमर्थतेच्या कालावधीमध्ये भरपाईच्या रुपाने नियोक्त्या-कडून मिळालेल्या कोणत्याही प्रदानाची किंवा भत्त्याची रक्कम अशा ठोक रकमेतून किंवा प्रकरण-परत्वे, अर्धमासिक प्रदानांमधून वजा केली जाईल; आणि

(ख) कोणत्याही बाबतीत, कामगाराला अपघातापूर्वी मिळणाऱ्या मासिक वेतनाच्या निम्मी रक्कम, अपघातानंतर त्याला मिळत असलेल्या वेतनाच्या निम्म्या रकमेपेक्षा काही रकमेने अधिक असल्यास, तितक्या रकमेपेक्षा कोणतेही अर्धमासिक प्रदान अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—कामगाराला त्याच्या वैद्यकीय उपचारार्थ, नियोक्त्याकडून जे कोणतेही प्रदान किंवा भत्ता मिळाला असेल ते प्रदान किंवा तो भत्ता, या परंतुकाच्या खंड (क) च्या अर्थानुसार, भरपाईच्या रुपाने त्याला मिळालेले प्रदान किंवा भत्ता असल्याचे मानले जाणार नाही.

(३) कोणतेही अर्धमासिक प्रदान ज्या दिनांकी देय होते त्या दिनांकापूर्वी निःसमर्थता समाप्त झाल्यास, त्या अर्ध्या महिन्याच्या संबंधात, त्या अर्ध्या महिन्यातील निःसमर्थतेच्या कालावधीबद्दल प्रमाणशीर अशी रक्कम प्रदेय होईल.]

[१][ (४) कामगाराचा मृत्यू जर इजेमुळे झाला असेल तर, नियोक्ता, पोट-कलम (१) खालील भरपाईच्या जोडीला, अशा कामगाराच्या अंत्यसंस्काराच्या खर्चापोटी, त्याच्या अवलंबित ज्येष्ठ उत्तरजीवीस किंवा कामगाराची कोणीही अवलंबित व्यक्ती नसेल किंवा त्याच्या मृत्यूच्या वेळी तो, त्याच्या अवलंबित व्यक्तीबरोबर राहात नसेल त्याबाबतीत जी व्यक्ती तो प्रत्यक्ष खर्च करील त्या व्यक्तीस देण्यासाठी, आयुक्ताकडे रुपये एक हजार एवढी रक्कम ठेवील.]

भरपाई देय असेल तेव्हा देणे आणि कसुरीबद्दल दंड.

[२][ **४क.** (१) कलम ४ खालील भरपाई देय होताच देण्यात येईल.

(२) मागणी करण्यात आली असेल इतक्या मर्यादेपर्यंतच्या भरपाईचे दायित्व नियोक्ता स्वीकारत नसेल अशा बाबतीत, तो जितके दायित्व स्वीकारील तितक्या मर्यादेवर आधारित असे तात्पुरते प्रदान करण्यास तो बांधलेला असेल, आणि असे प्रदान आयुक्ताकडे जमा केले जाईल किंवा, प्रकरणपरत्वे कामगाराला दिले जाईल–मात्र त्यामुळे आणखी कोणतीही हक्कमागणी करण्याच्या कामगाराच्या अधिकाराला बाध येणार नाही.]

[३][ (३) कोणताही नियोक्ता या अधिनियमाखाली देय असलेली भरपाई, ती देय झाली त्या दिनांका-पासून एक महिन्याच्या आत देण्यास चुकेल त्याबाबतीत, आयुक्त—

(क) नियोक्त्याला थकित रकमेच्या जोडीला, देय रकमेवरील दर साल दर शेकडा १२ दराने किंवा केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही अनुसूचित बँका ज्या दराने रकमा कर्जाऊ देतात त्या कमाल दरापेक्षा अधिक नसेल त्या दराने, सरळव्याज देण्याबाबत निदेश देईल;

(ख) विलंबाला कोणतेही समर्थन नाही असे जर त्याचे मत झाले असेल तर, थकबाकीच्या जोडीला दंड म्हणून अशा रकमेच्या पन्नास टक्क्यांहून अधिक नाही इतकी रक्कम आणि तीवरील व्याज नियोक्ता देईल, असा निदेश देईल :

परंतु, दंडप्रदान करण्यासंबंधीचा आदेश, तो संमत का करण्यात येऊ नये याबाबतची कारणे दाखविण्याची नियोक्त्याला वाजवी संधी दिल्याशिवाय, खंड (ख) अन्वये काढण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोट कलमाच्या प्रयोजनार्थ, "अनुसूचित बँक" याचा अर्थ, "भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४" (१९३४ चा २) याच्या अनुसूची दोन मध्ये त्या त्या वेळी समाविष्ट केलेली बँक, असा आहे.

(३क) पोटकलम-३ अन्वये देय असलेले व्याज कामगाराला किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या अवलंबिताला देण्यात येईल आणि दंडाची रक्कम राज्य शासनाकडे जमा करण्यात येईल.] ]

परिगणना करून वेतन ठरविण्याची पद्धती.

५. [४]*** [५][या अधिनियमामध्ये आणि त्याच्या प्रयोजनार्थ, "मासिक वेतन" या शब्दप्रयोगाचा अर्थ, महिन्याच्या सेवेबद्दल जी वेतनाची रक्कम प्रदेय असल्याचे समजण्यात येते (मग हे वेतन महिन्या-गणिक किंवा अन्य कोणत्याही ठराविक मुदतीगणिक प्रदेय असो वा उक्त्या दराने प्रदेय असो) आणि पुढीलप्रमाणे परिगणना करून ठरवली जाते अशी वेतनाची रक्कम, असा आहे,] ते असे—

---

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ४ (ग) द्वारे घातले.
२. १९५९ चा अधिनियम ८, कलम ५ द्वारे घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).
३. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ५ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी घातले.
४. १९३८ चा अधिनियम ९, कलम ४ द्वारे "(१)" हा कंस व आकडा गाळला.
५. १९३९ चा अधिनियम १३, कलम २ द्वारे "या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ कामगाराचे मासिक वेतन पुढीलप्रमाणे परिगणना करून ठरवले जाईल" या शब्दांऐवजी घातले (३० जून, १९३४ रोजी व तेव्हापासून).

(क) जो नियोक्ता भरपाई देण्यास दायी आहे अशा नियोक्त्याकडे तो कामगार अपघाताच्या लगतपूर्वी बारा महिन्यांहून कमी नाही इतका सलग काळ नोकरीला असेल तर, त्या कामगाराचे मासिक वेतन त्या कालावधीच्या मागील बारा महिन्यांमध्ये नियोक्त्याने त्याला द्यावयाचे म्हणून देय झालेल्या एकूण वेतनाच्या एक-बारांशाइतके असेल ;

[1][(ख) जो नियोक्ता भरपाई देण्यास दायी आहे अशा नियोक्त्याकडे तो कामगार अपघाताच्या लगतपूर्वी ज्या सलग कालावधीत नोकरीला होता तो संपूर्ण कालावधी एक महिन्याहून कमी असेल तर, त्या कामगाराचे मासिक वेतन हे अपघाताच्या लगतपूर्वीच्या बारा महिन्यांमध्ये त्याच नियोक्त्याकडे कामाला असलेला कामगार त्याच कामाबद्दल किंवा जर याप्रमाणे कामावर ठेवलेला कामगार नसेल तर त्याच स्थानिक भागात तशाच प्रकारच्या कामावर नेमलेला कामगार जितकी सरासरी मासिक रक्कम कमावत होता त्या रकमेइतके [2][असेल] ; ]

[3][(ग)] [4][अन्य बाबतीत (खंड (ख) खाली मासिक वेतन परिगणना करून ठरवणे हे आवश्यक त्या माहितीच्या अभावी शक्य नसेल अशी प्रकरणे धरून) ], मासिक वेतन हे, जो नियोक्ता भरपाई देण्यास दायी आहे त्या नियोक्त्याकडून अपघाताच्या लगतपूर्वीच्या नोकरीच्या सलग कालावधीसंबंधात कमावलेल्या एकूण वेतनाच्या तीस पटीला अशा कालावधीतील दिवसांच्या संख्येने भागले असता येणाऱ्या रकमेइतके असेल.

[5]* * * *

**स्पष्टीकरण.**---नोकरीच्या कालावधीत कामावरील अनुपस्थितीमुळे चौदा दिवसांपेक्षा अधिक काळ खंड पडलेला नसेल तर, तो कालावधी [6][या [7][कलमाच्या] ] प्रयोजनापुरता सलग असल्याचे मानले जाईल.

[8]* * * *

पुनर्विलोकन. ६. (१) या अधिनियमाखाली पक्षांमधील संमतिपत्राअन्वये किंवा आयुक्ताच्या आदेशान्वये प्रदेय असलेल्या अर्धमासिक प्रदानाचे, नियोक्त्याने किंवा कामगाराने, कामगाराच्या स्थितीत बदल घडून आला आहे अशा अर्थाचे अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीचे प्रमाणपत्र सोबत जोडून केलेल्या अर्जावरून अथवा असे प्रमाणपत्र सोबत न जोडता अर्ज केला असता, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांच्या अधीनतेने आयुक्ताला पुनर्विलोकन करता येईल.

(२) या कलमाखाली पुनर्विलोकन केल्यानंतर, कोणतेही अर्धमासिक प्रदान या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने चालू ठेवता येईल, वाढवता येईल, कमी करता येईल किंवा समाप्त करता येईल अथवा या अपघातामुळे कायमची निःसमर्थता आली असल्याचे आढळून आले तर, कामगार ज्या रकमेला हक्कदार असेल त्या रकमेतून त्याला अर्धमासिक प्रदानाच्या रूपाने आधीच मिळालेली कोणतीही रक्कम वजा केल्यानंतर राहील त्या ठोक रकमेत ते रूपांतरित करता येईल.

अर्धमासिक प्रदानाचे संराशीकरण. ७. अर्धमासिक प्रदाने मिळवण्याच्या कोणत्याही अधिकाराबाबत पक्षांमधील संमतिपत्राद्वारे किंवा, जर दोन्ही पक्षांचे एकमत झाले नाही आणि ही प्रदाने सहा महिन्यांहून कमी नाही इतका काळ सतत चालू राहिलेली असली तर, कोणत्याही पक्षकाराने आयुक्ताकडे अर्ज केल्यास, पक्षांना संमत होईल अशा किंवा, प्रकरणपरत्वे, आयुक्त ठरवील अशा ठोक रकमेच्या प्रदानाच्या बदल्यात हक्कविमोचन करता येईल.

भरपाईचे वाटप. ८. [9][(१) ज्याच्या इजेचे पर्यवसान मृत्यूमध्ये झाले आहे अशा कामगाराच्या संबंधात कोणतेही भरपाईचे प्रदान, आणि स्त्रीला किंवा वैध निःसमर्थतेस पात्र असलेल्या व्यक्तीला भरपाई म्हणून कोणत्याही ठोक रकमेचे प्रदान, आयुक्ताकडे जमा करण्याहून अन्य प्रकारे केले जाणार नाही, आणि नियोक्त्याने प्रत्यक्षपणे केलेले असे कोणतेही प्रदान हे भरपाईचे प्रदान असल्याचे मानले जाणार नाही :

[10][परंतु, मृत कामगाराच्या बाबतीत, नियोक्ता कोणत्याही अवलंबित व्यक्तीला भरपाईदाखल [11][तीन महिन्यांच्या वेतनाइतकी आगाऊ रक्कम देऊ शकेल आणि अशा रकमेपैकी त्या अवलंबितास प्रदेय असलेल्या भरपाईहून जास्त नसेल तितकी रक्कम आयुक्त अशा भरपाईतून वजा करून नियोक्त्याला परत करील.]

---

१. १९३३ चा अधिनियम १५, कलम ५ द्वारे घातले.

२. १९३९ चा अधिनियम १३, कलम २ द्वारे "असल्याचे मानण्यात येईल" या शब्दांऐवजी घातले (३० जून, १९३४ रोजी व तेव्हापासून).

३. १९३३ चा अधिनियम १५, कलम ५ द्वारे मूळ खंड (ख) यास खंड (ग) असे नाव दिले.

४. १९५९ चा अधिनियम ८, कलम ६ द्वारे "अन्य बाबतीत" याऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

५. १९३३ चा अधिनियम १५, कलम ५ द्वारे परंतुक गाळले.

६. १९२९ चा अधिनियम ५, कलम ३ द्वारे "या कलमाच्या" या शब्दांऐवजी घातले.

७. १९३८ चा अधिनियम ९, कलम ४ द्वारे "पोटकलमाच्या" या शब्दांऐवजी घातले.

८. १९२९ चा अधिनियम ५, कलम ३ द्वारे अधिक घातलेले पोटकलम १९३३ चा अधिनियम १५, कलम ५ द्वारे गाळले.

९. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ पोटकलमे (१) ते (३) याऐवजी घातले.

१०. १९३३ चा अधिनियम १५, कलम ६ द्वारे पूर्वीच्या परंतुकाऐवजी घातले.

११. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ६ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(२) भरपाई म्हणून प्रदेय असलेली दहा रुपयांहून कमी नाही इतकी अन्य कोणतीही रक्कम त्या रकमेला हक्कदार असणाऱ्या व्यक्तीच्या वतीने आयुक्ताकडे जमा करता येईल.

(३) आयुक्ताने दिलेली पावती ही त्याच्याकडे जमा केलेल्या कोणत्याही भरपाईच्या संबंधात पुरेशी विमुक्ती ठरेल.]

(४) [१][मृत कामगाराच्या संबंधात भरपाई म्हणून] पोटकलम (१) खाली कोणतीही रक्कम जमा करण्यात आल्यानंतर, आयुक्त [२][* * * *] जर त्याला आवश्यक वाटले तर, भरपाईचे वाटे ठरविण्यासाठी तो निश्चित करील अशा दिनांकास अवलंबित व्यक्तींना उपस्थित राहण्यास फर्मावणारी नोटीस प्रकाशित करण्याची किंवा त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रत्येक अवलंबित व्यक्तीवर ती बजावण्याची व्यवस्था करील. आपणांस आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर कोणतीही अवलंबित व्यक्ती अस्तित्वात नसल्याबद्दल आयुक्ताची खात्री पटली तर, तो शिल्लक रक्कम ज्या नियोक्त्याने ती दिली होती त्याला परत देईल. आयुक्त, नियोक्त्याने अर्ज केला असता, त्यास सर्व संवितरित रकमांचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र पुरवील.

[३][(५) मृत कामगाराच्या संबंधात जमा केलेली भरपाईची रक्कम पोटकलम (४) खाली करावयाची कोणतीही वजात करून मृत कामगाराच्या अवलंबित व्यक्तींमध्ये किंवा त्यांच्यापैकी कोणामध्येही आयुक्तास योग्य वाटेल अशा प्रमाणात संविभाजित करता येईल किंवा आयुक्ताच्या विवेकानुसार कोणत्याही एका अवलंबित व्यक्तीच्या वाट्याला देण्यात येईल.

(६) आयुक्ताकडे जमा केलेली कोणतीही भरपाईची रक्कम कोणत्याही व्यक्तीस प्रदेय असेल तेव्हा आयुक्त, भरपाईची रक्कम ज्या व्यक्तींस प्रदेय आहे ती व्यक्ती ही एखादी स्त्री किंवा वैध निःसमर्थतेस पात्र झालेली व्यक्ती नसेल तर, तिला देईल आणि अन्य प्रकरणी ती रक्कम हक्कदार व्यक्तीस देऊ शकेल.

(७) जेव्हा आयुक्ताकडे जमा केलेली कोणतीही ठोक रक्कम एखाद्या स्त्रीला किंवा वैध निःसमर्थतेस पात्र झालेल्या व्यक्तीला प्रदेय असेल तेव्हा, आयुक्त निदेश देईल अशा रीतीने त्या स्त्रीच्या किंवा अशी व्यक्ती निःसमर्थ असेतोवर त्या व्यक्तीच्या हितासाठी अशा रकमेची गुंतवणूक किंवा उपयोजन करता येईल किंवा अन्यथा व्यवहार करता येईल; आणि वैध निःसमर्थतेस पात्र झालेल्या कोणत्याही व्यक्तीस अर्धमासिक प्रदान प्रदेय असेल तेव्हा, आयुक्त स्वतः होऊन किंवा या बाबतीत त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून असा आदेश देऊ शकेल की, जी कोणतीही कामगाराची अवलंबित व्यक्ती किंवा अन्य व्यक्ती कामगाराच्या कल्याणाची काळजी वाहण्यास सुयोग्य आहे असे आयुक्तास वाटेल अशा व्यक्तीस प्रदान करण्यात यावे.]

[४][(८)] आयुक्ताकडे या बाबतीत करण्यात आलेल्या अर्जावरून किंवा अन्यथा जर त्याची अशी खात्री पटली की, भरपाई म्हणून दिलेल्या कोणत्याही रकमेचे वाटप करण्याच्या संबंधात किंवा अशा कोणत्याही अवलंबित व्यक्तीस देय असलेल्या कोणत्याही रकमेची कशा रीतीने गुंतवणूक किंवा उपयोजन करण्यात यावे किंवा अन्यथा व्यवहार करण्यात यावा त्या संबंधात आयुक्ताने दिलेला आदेश आई-वा-बापाकडून मुलांकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे किंवा कोणत्याही अवलंबित व्यक्तीच्या परिस्थितीमध्ये बदल झाल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही पुरेशा कारणास्तव बदलावयास हवा, तर आयुक्तास पूर्वीच्या आदेशामध्ये बदल करण्यासाठी ह्या प्रकरणाच्या परिस्थितीमध्ये त्याला योग्य वाटतील असे आदेश काढता येतील :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस बाधक असा कोणताही आदेश काढावयाचा झाल्यास, असा आदेश का काढण्यात येऊ नये यासंबंधी कारण दाखवण्याची संधी अशा व्यक्तीस दिल्याखेरीज, किंवा अवलंबित व्यक्तीस अगोदरच देण्यात आलेली रक्कम त्यामुळ तिला परत करावी लागेल अशा कोणत्याही प्रकरणी तो काढण्यात येणार नाही.

[५][(९) कोणत्याही व्यक्तीला करण्यात आलेले भरपाईचे प्रदान हे कपट वा तोतयेगिरी करून किंवा अन्य अयोग्य मार्गांनी घडवून आणण्यात आले आहे. या कारणामुळे आयुक्ताने आदेशात बदल केल्यास, अशा व्यक्तीला दिलेली किंवा तिच्या वतीने कोणालाही याप्रमाणे देण्यात आलेली रक्कम यात यापुढे कलम ३१ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने वसूल करता येईल.]

९. या अधिनियमाद्वारे उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, या अधिनियमाखाली प्रदेय असलेली कोणतीही ठोक रक्कम किंवा अर्धमासिक प्रदान कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित किंवा प्रभारित करता येणार नाही किंवा जप्त होण्यास पात्र असणार नाही किंवा कायद्याच्या प्रवर्तनामुळे कामगाराखेरीज अन्य व्यक्तीकडे जाणार नाही अथवा त्या रकमेशी कोणत्याही हक्कमागणीची वजावट करण्यात येणार नाही. भरपाईची रक्कम अभिहस्तांकित, जप्त किंवा प्रभारित करावयाची नाही.

---

१. १९२९ चा अधिनियम ५, कलम ४ द्वारे घातले.

२. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ६(ख) द्वारे वगळले.

३. १९२९ चा अधिनियम ५, कलम ४ द्वारे मूळ पोटकलम (५) ते (७) याऐवजी घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ पोटकलम (६) याला पोटकलम (८) असा नवीन क्रमांक दिला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे जादा दाखल केले.

नोटीस व मागणी. १०. (१) [1][कोणतीही भरपाईची मागणी, अपघात झाल्यापासून व्यवहार्य होईल तितक्या लवकर, त्याची नोटीस यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने देण्यात आल्याखेरीज आणि अपघात झाल्यापासून [2][दोन वर्षांच्या] आत किंवा मृत्यू झाला असल्यास मृत्यूच्या दिनांकापासून [2][दोन वर्षांच्या] आत ती मागणी आयुक्तांकडे सादर करण्यात आल्याखेरीज, आयुक्त विचारार्थ स्वीकारणार नाही: ]

परंतु, अपघात, कलम ३ पोटकलम (२) चे उपबंध ज्याच्या संबंधात लागू होतात असा रोग जडण्याच्या स्वरूपाचा असेल तर, रोगामुळे उद्‌भवलेल्या निःसमर्थतेच्या परिणामी कामगार ज्या मुदतीत कामावर सतत अनुपस्थित असेल त्या मुदतीच्या पहिल्या दिवशी अपघात झाला असल्याचे मानण्यात येईल :

[3][परंतु आणखी असे की, असा कोणताही रोग जडल्यामुळे उद्‌भवलेल्या व ज्यामुळे कामगाराला कामावर अनुपस्थित राहणे भाग पडले नसेल अशा आंशिक निःसमर्थतेच्या बाबतीत, दोन वर्षांचा अवधी कामगार त्याच्या निःसमर्थतेची नोटीस त्याच्या नियोक्त्यास ज्या दिवशी देईल त्या दिवसापासून मोजण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जर कामगार एखाद्या कामधंद्यात त्या कामधंद्याच्या संबंधात कलम ३ पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तितका सलग काळ राहिल्यानंतर त्याचा असा कामधंदा बंद होईल आणि त्याचा कामधंदा बंद झाल्यापासून दोन वर्षांच्या आत त्या कामधंद्यामुळे विशेषकरून उद्‌भवणाऱ्या व्यवसायजन्य रोगाची लक्षणे त्याच्या ठिकाणी दिसू लागतील त्याबाबतीत, ज्या दिवशी ती लक्षणे प्रथम लक्षात येतील त्या दिवशी अपघात झाला, असे मानण्यात येईल: ]

[4][परंतु आणखी असे की,—

(क) जर, नियोक्त्याच्या वास्तूमध्ये अथवा अपघाताच्या वेळी नियोक्त्याच्या किंवा त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या नियंत्रणाखाली ज्या ठिकाणी कामगार काम करीत होता अशा अन्य ठिकाणी झालेल्या अपघातामुळे घडून आलेल्या कामगाराच्या मृत्यूसंबंधात मागणी [5][सादर करण्यात] आली असेल आणि कामगार अशा वास्तूमध्ये किंवा अशा ठिकाणी किंवा नियोक्त्याच्या अन्य कोणत्याही वास्तूमध्ये मरण पावला असेल किंवा अपघात जेथे घडला त्या वास्तूच्या किंवा ठिकाणाच्या परिसरातून बाहेर पडण्यापूर्वी तो मरण पावला असेल तर, किंवा

(ख) नियोक्त्याला [6][अथवा अनेक नियोक्त्यांपैकी कोणाही एकाला अथवा इजा पोचलेला कामगार जेथे कामाला होता तो उदीम किंवा धंदा याच्या कोणत्याही शाखेच्या व्यवस्थापनाकरिता नियोक्त्याला जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीला,] अपघात घडला त्यावेळी किंवा त्या सुमारास अन्य कोणत्याही मार्गाने त्याची माहिती कळली असेल तर,

—नोटीस दिलेली नसणे किंवा नोटिशीत कोणतीही उणीव अथवा नियमबाह्य गोष्ट असणे, यामुळे [7][मागणी विचारार्थ स्वीकारण्यास] आडकाठी होणार नाही :]

परंतु आणखी असे की, कोणत्याही प्रकरणी या पोटकलमात उपबंधित केल्याप्रमाणे योग्य वेळेत नोटीस देण्यात आलेली नसली किंवा त्या वेळेत भरपाईची मागणी [8][सादर करण्यात] आलेली नसली तरीही, जर याप्रमाणे नोटीस देण्यात किंवा, प्रकरणपरत्वे, मागणी [8][सादर करण्यात] झालेली कसूर ही, पुरेशा कारणामुळे झाली होती अशी आयुक्ताची खात्री पटली तर, त्याला अशी कोणतीही भरपाईची मागणी [9][विचारार्थ स्वीकारता] येईल व निर्णीत करता येईल.

(२) अशा प्रत्येक नोटिशीमध्ये इजा पोहोचलेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता देण्यात येईल आणि त्यात इजेचे कारण व अपघात घडल्याचा दिनांक सर्वसामान्य भाषेमध्ये नमूद करण्यात येईल, आणि ती नोटीस नियोक्त्यावर किंवा [10][अनेक नियोक्त्यांपैकी कोणाही एकावर] किंवा कामगार जेथे कामावर होता त्या उदीमाच्या किंवा धंद्याच्या कोणत्याही शाखेच्या व्यवस्थापनाकरिता नियोक्त्यास [11]* * * * जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर बजावण्यात येईल.

---

१. १९३८ चा अधिनियम ९, कलम ५ द्वारे विवक्षित मूळ मजकुराऐवजी घातले.

२. १९५९ चा अधिनियम ८, कलम ८ द्वारे "एक वर्षाच्या" याऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून.)

३. १९६२ चा अधिनियम ६४, कलम ५ द्वारे घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

४. १९३३ चा अधिनियम १५, कलम ७ द्वारे घातले.

५. १९३८ चा अधिनियम ९, कलम ५ द्वारे "करण्यात" या शब्दाऐवजी घातले.

६. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे घातले.

७. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "कार्यवाही चालवण्यास" या शब्दांऐवजी घातले.

८. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "मांडण्यात" या शब्दाऐवजी घातले.

९. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "स्वीकृत करता" या शब्दांऐवजी घातले.

१०. १९२४ चा अधिनियम ७, कलम २ व अनुसूची यांद्वारे "कोणाही एका किंवा अनेक नियोक्त्यांवर" या शब्दांऐवजी घातले.

११. १९३८ चा अधिनियम ९, कलम ५ द्वारे "प्रत्यक्षपणे" हा शब्द गाळला.

[१][(३) कोणत्याही विहित वर्गाच्या नियोक्त्याने जेथे कामगार कामावर असतील अशा त्यांच्या वास्तूमध्ये विहित नमुन्यात एक नोटीस-पुस्तक राखावे व ते त्या वास्तूमध्ये कामावर असलेल्या कोणत्याही इजा पोहोचलेल्या कामगारास किंवा त्याच्या वतीने सद्भावपूर्वक कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वाजवी वेळात सहजगत्या उपलब्ध व्हावे, असे [२][राज्य शासन] फर्मावू शकेल.

(४) या कलमाखालील नोटीस, ज्या व्यक्तीवर ती बजावयाची असेल त्या व्यक्तीच्या निवासस्थानी किंवा कार्यालयात किंवा तिच्या कामधंद्याच्या ठिकाणी सुपूर्द करून किंवा त्या पत्त्यावर नोंदणी डाकेने पाठवून किंवा नोटीस-पुस्तक ठेवलेले असल्यास त्या नोटीस-पुस्तकात नोंद करून बजावण्यात येईल.]

प्राणांतिक अपघातांच्या संबंधात नियोक्त्यांकडून विवरणपत्र मागवण्याची शक्ती.

[३][१०क. (१) एखादा कामगार कामधंद्यामुळे उद्भवलेल्या आणि त्याच्या ओघात झालेल्या अपघाताच्या परिणामी मरण पावला आहे, अशी माहिती कोणत्याही मार्गाने आयुक्ताला मिळाली तर, तो कामगाराच्या नियोक्त्याला नोंदणी डाकेने नोटीस पाठवून त्याला असे फर्मावू शकेल की, नोटीस बजावल्याच्या दिवसापासून तीस दिवसांच्या आत नियोक्त्याने, ज्या परिस्थितीत कामगाराचा मृत्यू घडून आला ती परिस्थिती नमूद करणारे आणि नियोक्त्याच्या मते तो स्वत: मृत्यूबद्दल भरपाईची रक्कम जमा करण्यास दायी आहे किंवा नाही हे दर्शविणारे विहित नमुन्यामधील विवरणपत्र सादर करावे.

(२) आपण भरपाईची रक्कम जमा करण्यास दायी आहोत असे नियोक्त्याचे मत असेल तर, तो नोटीस बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत रक्कम जमा करील.

(३) आपण भरपाईची रक्कम जमा करण्यास दायी नाही असे नियोक्त्याचे मत असेल तर, तो ज्या कारणांकरिता दायित्व नाकारीत असेल ती कारणे तो त्याच्या विवरणपत्रात नमूद करील.

(४) नियोक्त्याने याप्रमाणे आपले दायित्व नाकारले असेल त्याबाबतीत, आयुक्त स्वत:ला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, मृत कामगारांच्या अवलंबित व्यक्तींना भरपाईकरिता मागणी सादर करण्याची मोकळीक आहे, असे त्या अवलंबितांपैकी कोणालाही कळवू शकेल आणि आपणांस योग्य वाटेल अशी आणखी अन्य माहिती त्यांना पुरवू शकेल.

प्राणांतिक अपघातांची व गंभीर स्वरूपाच्या शारीरिक इजांची प्रतिवृत्ते.

१०ख. (१) नियोक्त्याच्या वास्तूमध्ये घडलेल्या ज्या कोणत्याही अपघाताचे पर्यवसान एखाद्याच्या मृत्यूत [४][किंवा गंभीर शारीरिक इजेमध्ये] होते त्याबाबत कोणत्याही प्राधिकरणाला नियोक्त्याने किंवा त्याच्या वतीने नोटीस देणे त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार आवश्यक असेल तेव्हा, जिने अशी नोटीस देणे आवश्यक असते त्या व्यक्तीला, मृत्यू किंवा गंभीर शारीरिक इजा ज्या परिस्थितीत घडून आली ती परिस्थिती नमूद करणारे एक प्रतिवृत्त, मृत्यू [४][किंवा गंभीर शारीरिक इजा] घडल्यापासून सात दिवसांच्या आत आयुक्ताकडे पाठवावे लागेल :

परंतु, जेव्हा राज्य शासनाने अन्यथा विहित केलेले असेल तेव्हा त्यानुसार जिने अशी नोटीस देणे आवश्यक आहे त्या व्यक्तीला, असे प्रतिवृत्त आयुक्ताकडे पाठविण्याऐवजी, ज्या प्राधिकरणाला तिने अशी नोटीस देणे आवश्यक आहे त्या प्राधिकरणाकडे ते पाठवावे लागेल.

[४][**स्पष्टीकरण.**—"गंभीर शारीरिक इजा" याचा अर्थ, ज्या इजेमुळे परिणामी कोणत्याही गात्राची उपयुक्तता गमवावी लागते किंवा त्याला कायमची इजा पोचते अथवा दृष्टी किंवा श्रवणशक्ती कायमची गमवावी लागते किंवा त्यांना कायमची इजा पोचते अथवा कोणत्याही गात्राचे हाड मोडणे अथवा इजा पोहोचलेल्या व्यक्तीला वीस दिवसांहून अधिक काळ कामावर अनुपस्थित राहणे भाग पडणे अगर ज्या इजेमुळे असे घडणे सर्वथा संभाव्य आहे ती इजा, असा आहे.]

(२) राज्य शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पोटकलम (१) च्या उपबंधाची व्याप्ती त्या पोटकलमाच्या कक्षेत येणाऱ्या वास्तूंहून अन्य अशा कोणत्याही प्रकारच्या वास्तुवर्गापर्यंत वाढवता येईल आणि कोणत्या व्यक्तींनी आयुक्ताकडे प्रतिवृत्त पाठवावे, ते अशा अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येईल.

[५][(३) या कलमातील कोणतीही गोष्ट ज्या कारखान्यांना 'राज्य कामगार विमा अधिनियम, १९४८' (१९४८ चा ३४) लागू होतो त्या कारखान्यांना लागू होणार नाही.]]

वैद्यकीय तपासणी.

**११.** (१) जेव्हा कामगाराने अपघाताची नोटीस दिलेली असेल तेव्हा, अशी नोटीस बजावण्यात आल्याच्या वेळेपासून तीन दिवस संपण्यापूर्वी नियोक्त्याने त्या कामगाराची अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीकरवी विनामूल्य तपासणी करवून घेण्याची तयारी दाखविली तर, त्या कामगाराला स्वत:ची अशी तपासणी करून घ्यावी लागेल आणि ज्या कामगाराला या अधिनियमाखाली अर्धमासिक प्रदान मिळते अशा कोणत्याही कामगाराला तसे फर्मावण्यात आल्यास, वेळोवेळी स्वत:ची अशी तपासणी करून घ्यावी लागेल :

---

१. १९३३ चा अधिनियम १५, कलम ७ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी घातले.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय सरकार' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९३३ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे घातले.

४. १९५९ चा अधिनियम ८, कलम ९ द्वारे घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

परंतु, कोणत्याही कामगाराला या अधिनियमाखाली केलेल्या नियमांना अनुसरून असेल त्याहून अन्यथा किंवा विहित असेल त्याहून कमी कालांतरागणिक तपासणी करून घेण्यास फर्मावता येणार नाही.

(२) जर एखाद्या कामगाराला नियोक्त्याने पोटकलम (१) खाली किंवा आयुक्ताने कोणत्याही वेळी तसे करण्यास फर्मावले असता, अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीकडून तपासणी करून घेण्याचे त्याने नाकारले किंवा त्यास कोणत्याही प्रकारे अटकाव केला तर, त्याचा भरपाई मिळण्याबाबतचा अधिकार हा असा नकार किंवा अटकाव चालू असेपर्यंत निलंबित होईल—मात्र नकाराच्या बाबतीत, तो कोणत्याही पुरेशा कारणामुळे याप्रमाणे तपासणीला हजर राहू शकला नाही तर गोष्ट अलाहिदा.

(३) एखादा कामगार ज्या कालावधीत पोटकलम (१) खाली वैद्यकीय तपासणी करून घेण्यास पात्र असेल तो कालावधी संपण्यापूर्वी तो तपासणी करवून घेतल्याशिवाय, ज्या ठिकाणी तो कामावर आहे त्या ठिकाणचा परिसर सोडून आपण होऊन निघून गेला तर, त्याचा भरपाई मिळण्याबाबतचा अधिकार तो परत येऊन अशी तपासणी करवून घेण्याची तयारी दाखवीपर्यंत निलंबित होईल.

(४) ज्याचा भरपाई मिळण्याबाबतचा अधिकार पोटकलम (२) खाली किंवा पोटकलम (३) खाली निलंबित झाला आहे असा कामगार जर त्या दोहोंपैकी कोणत्याही पोटकलमाद्वारे आवश्यक केल्याप्रमाणे वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित झाल्याशिवाय मृत्यू पावला तर, आयुक्त, त्याला योग्य वाटल्यास, अशा मृत कामगाराच्या अवलंबित व्यक्तींना भरपाई देण्याचा निदेश देऊ शकेल.

(५) जेव्हा पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) खाली भरपाईबाबतचा अधिकार निलंबित होईल तेव्हा, निलंबनाच्या कालावधीच्या संबंधात कोणतीही भरपाई प्रदेय असणार नाही आणि जर निलंबनाचा कालावधी, कलम ४, पोटकलम (१) च्या खंड (घ) मध्ये निर्देशिलेला प्रतिक्षा कालावधी संपण्यापूर्वी सुरू होत असेल तर, हा प्रतीक्षा कालावधी निलंबन चालू असेल तितक्या कालावधीने वाढवला जाईल.

(६) जेव्हा एखाद्या इजा पोचलेल्या कामगाराला नियोक्त्याने ज्याची सेवा विनामूल्य देऊ केली आहे, त्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीकडून उपचार करून घेण्यास कामगाराने नकार दिला असेल किंवा अशी सेवा स्वीकारल्यानंतर अशा वैद्यक व्यवसायीच्या सूचनांकडे बुद्धिपुरःसर दुर्लक्ष केले असेल तेव्हा, [1][जर त्या कामगारावर अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने त्यानंतर नियमितपणे उपचार केलेले नाहीत किंवा असे उपचार केलेले असूनही त्याच्या सूचनांचे पालन करण्यास तो कामगार बुद्धिपुरःसर चुकला आहे आणि असा नकार, दुर्लक्ष किंवा कसूर] प्रकरणाच्या परिस्थितीनुसार [1][गैरवाजवी होती] आणि त्यामुळे ती इजा आणखी विकोपास गेली [1][असे शाबीत झाले तर,] ती इजा आणि परिणामतः येणारी निःसमर्थता त्याच स्वरूपाची मानली जाईल आणि [1][त्या कामगाराने ज्याच्या सूचनांचे पालन केले होते] त्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीकडून त्याच्यावर नियमित उपचार झाले असते तर इजा व निःसमर्थता जशा स्वरूपाची व जितका काळ राहील अशी वाजवी अपेक्षा करता आली असती तशाच स्वरूपाची व तितक्याच मुदतीची ती आहे, असे मानले जाईल आणि काही भरपाई असल्यास ती तद्नुसार प्रदेय होईल.

**संविदा करणे.** १२. (१) जेव्हा कोणतीही व्यक्ती (या कलमात यापुढे "प्रकर्ता" असे निर्देशिण्यात आलेली) आपल्या उदिमाच्या किंवा धंद्याच्या ओघात किंवा त्याच्या प्रयोजनांसाठी अन्य कोणत्याही व्यक्तीशी (या कलमात यापुढे "संविदाकार" असे निर्देशिण्यात आलेली) जे काम सर्वसामान्यपणे प्रकर्त्याच्या उदिमाचा किंवा धंद्याचा एक भाग आहे असे कोणतेही संपूर्ण काम किंवा त्याचा काही भाग त्या संविदाकाराकडून किंवा त्याच्या देखरेखीखाली करवून घेण्याचा करार करील तेव्हा, काम करण्यासाठी कामावर ठेवलेल्या कोणत्याही कामगाराला तो प्रकर्ता जर त्याने स्वतःच प्रत्यक्षपणे त्या कामगाराला कामावर ठेवले असते तर, त्याला जी भरपाई देण्यास तो दायी ठरला असता ती भरपाई देण्यास दायी असेल; आणि जेव्हा प्रकर्त्याकडे अशा भरपाईची मागणी केली जाईल तेव्हा, हा अधिनियम, त्यामध्ये जणू काही प्रकर्त्याच्या उल्लेखांऐवजी नियोक्त्याचे उल्लेख केलेले असावेत त्याप्रमाणे लागू होईल—मात्र भरपाईची रक्कम ही प्रत्यक्ष ज्या नियोक्त्याकडे त्या कामगाराला कामावर ठेवले असेल त्या नियोक्त्याकडे कामगाराला जितके वेतन मिळत होते त्याच्या संदर्भात परिगणना करून ठरवली जाईल.

(२) जेव्हा प्रकर्ता या कलमाखाली भरपाई देण्यास दायी असेल तेव्हा, तो संविदाकाराकडून [2][किंवा जिच्याकडून कामगाराला भरपाई वसूल करता आली असती अशा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून] हानिरक्षण मिळण्यास हक्कदार असेल [2][आणि जेव्हा स्वतःच प्रकर्ता असणारा संविदाकार या कलमाखाली भरपाई देण्यास किंवा प्रकर्त्याचे हानिरक्षण करण्यास दायी असेल तेव्हा, ज्याच्याकडून कामगाराला भरपाई वसूल करता आली असती असा संविदाकार म्हणून ज्या व्यक्तीचा त्याच्याशी संबंध असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून हानिरक्षण मिळण्यास हक्कदार असेल] आणि अशा कोणत्याही हानिरक्षणाबाबतचा अधिकार आणि त्याची रक्कम इत्यादींसारखे सर्व प्रश्न, संमतिपत्राच्या अभावी, आयुक्ताकडून मिटवले जातील.

(३) प्रकर्त्याऐवजी संविदाकाराकडून भरपाई वसूल करण्यास कामगाराला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होतो, असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

---

१. १९३८ चा अधिनियम ९, कलम ६ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

२. १९३३ चा अधिनियम ५, कलम ९ द्वारे घातले.

(४) ज्या वास्तूवर प्रकर्त्याने एखादे काम हाती घेतले आहे किंवा, प्रकरणपरत्वे, जेथे तो सर्व-सामान्यपणे हाती घेतो, अथवा जी वास्तू अन्यथा त्याच्या नियंत्रणाखाली किंवा व्यवस्थापनाखाली आहे अशा वास्तूवरील, तिच्यामधील किंवा तिच्याजवळील जागेहून अन्य ठिकाणी अपघात घडला असेल अशा कोणत्याही प्रकरणी हे कलम लागू होणार नाही.

१३. एखाद्या कामगाराने कोणत्याही इजेसंबंधात भरपाई वसूल केली असून जिने ती भरपाई दिली त्या व्यक्तीहून अन्य एखाद्या व्यक्तीवर त्या इजेबाबत नुकसानी देण्याचे दायित्व निर्माण होईल अशा परिस्थितीत ती इजा घडलेली असेल तर, ज्या व्यक्तीने भरपाई दिली ती व्यक्ती आणि ज्या व्यक्तीकडे कलम १२ खाली हानिरक्षण करण्याची मागणी केली होती ती व्यक्ती, पूर्वी म्हटल्याप्रमाणे नुकसानी देण्यास अशाप्रकारे दायी असणाऱ्या व्यक्तीकडून हानिरक्षण मिळण्यास हक्कदार असेल. नियोक्त्याला त्रयस्थ व्यक्ती विरुद्ध योजता येतील असे उपाय.

१४. (१) जेव्हा कोणत्याही कामगारासंबंधीच्या या अधिनियमाखालील कोणत्याही दायित्वाबाबत एखाद्या नियोक्त्याने कोणत्याही विमाकारांशी संविदा केली असेल तेव्हा, नियोक्ता नादार झाल्यास अथवा त्याने आपल्या धनकोंशी तडजोड केल्यास किंवा व्यवस्थाविषयक योजना केल्यास, अथवा नियोक्ता ही कंपनी असेल तर, अशा कंपनीच्या परिसमापनास प्रारंभ झालेला असल्यास, त्या दायित्वापुरते त्या नियोक्त्याला विमाकाराविरुद्ध असणारे अधिकार हे, नादारी किंवा कंपन्यांचे परिसमापन यासंबंधी त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही असले तरी, कामगाराकडे हस्तांतरित होऊन त्याच्या ठायी निहित होतील, आणि अशा कोणत्याही हस्तांतरणानंतर विमाकारांना जणू काही ते नियोक्ता असावेत त्याप्रमाणे तेच अधिकार व उपाय उपलब्ध असतील आणि त्याच दायित्वांना अधीन राहावे लागेल, तथापि, अशा रीतीने की, जेणेकरून विमाकारांना नियोक्त्याप्रत जितक्या दायित्वास अधीन राहावे लागले असते, त्याहून अधिक दायित्वास कामगाराच्या बाबतीत त्यांना अधीन राहावे लागणार नाही. नियोक्त्याची नादारी.

(२) जर विमाकारांचे कामगाराप्रत असणारे दायित्व हे, नियोक्त्याच्या कामगाराप्रत असणाऱ्या दायित्वापेक्षा कमी असेल तर, कामगार नादारीबाबतच्या कार्यवाहीत किंवा परिसमापनामध्ये बाकी रक्कम शाबीत करू शकेल.

(३) जेव्हा पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही प्रकरणात, नियोक्त्याची विमाकाराशी झालेली संविदा नियोक्त्याने संविदेच्या कोणत्याही अटींचे किंवा शर्तींचे (हप्त्याच्या प्रदानाबाबतच्या अटींहून अन्य) अनुपालन न केल्याच्या कारणावरून शून्य किंवा शून्यकरणीय असेल तेव्हा, जणू काही ती संविदा शून्य किंवा शून्यकरणीय नसावी त्याप्रमाणे त्या पोटकलमाचे उपबंध लागू होतील, आणि विमाकार हे कामगाराला दिलेल्या रकमा नादारीबाबतच्या कार्यवाहीत किंवा परिसमापनामध्ये शाबीत करण्यास हक्कदार असतील :

परंतु, नादारीची किंवा परिसमापनाची कार्यवाही सुरू झाल्याची माहिती आपणांस मिळाल्यापासून व्यवहार्य होईल तितक्या लवकर जर अपघात घडल्याची व त्यातून उद्भवलेल्या कोणत्याही निःसमर्थतेची नोटीस विमाकारांना देण्यास कामगार चुकला असेल अशा कोणत्याही प्रकरणी, या पोटकलमाचे उपबंध लागू होणार नाहीत.

(४) जी ऋणे 'इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९' (१९०९ चा ३) याच्या कलम ४९ खाली किंवा 'प्रांतीय नादारी अधिनियम, १९२०' (१९२० चा ५) याच्या कलम ६१ खाली किंवा [1][कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या कलम ५३०] खाली, नादार व्यक्तीच्या संपत्तीचे वाटप करताना किंवा परिसमापित केल्या जाणाऱ्या कंपनीच्या मत्तेचे वाटप करताना जी ऋणे अन्य सर्व ऋणांच्या आधी द्यावयाची असतात त्या ऋणांमध्ये, नादार म्हणून अभिनिर्णीत करणाऱ्या आदेशाच्या दिनांकापूर्वी किंवा, प्रकरणपरत्वे, परिसमापनास प्रारंभ केल्याच्या दिनांकापूर्वी ज्याबाबतचे दायित्व प्रोद्भूत झाले आहे अशा कोणत्याही भरपाईच्या संबंधात देय असलेली रक्कम समाविष्ट असल्याचे समजले जाईल आणि ते अधिनियम तद्नुसार परिणामक होतील.

(५) जेव्हा भरपाई म्हणजे अर्धमासिक प्रदान असेल तेव्हा, त्यासंबंधात देय असलेली रक्कम म्हणजे अर्धमासिक प्रदान संराशीकरणयोग्य असल्यास कलम ७ खाली त्या प्रयोजनासाठी अर्ज करण्यात आला असता तर, अर्धमासिक प्रदान ज्या ठोक रकमेत संराशीकृत करता आले असते, ती रक्कम असल्याचे समजले जाईल आणि अशी रक्कम किती, यासंबंधी आयुक्ताने दिलेले प्रमाणपत्र हे, त्याचा निर्णायक पुरावा असेल.

(६) विमाकार पोटकलम (३) खाली जी रक्कम शाबीत करण्यास हक्कदार आहे अशा रकमेच्या बाबतीत पोटकलम ४ चे उपबंध लागू होतील, पण नादार व्यक्तीने किंवा परिसमापित होणाऱ्या कंपनीने विमाकारांशी पोटकलम (१) मध्ये निर्देशिल्याप्रमाणे संविदा केलेली असेल तर, अन्यथा ते उपबंध लागू होणार नाहीत.

(७) जेव्हा एखादी कंपनी पुनर्रचनेसाठी किंवा दुसऱ्या कंपनीशी संमिलित होण्यासाठीच केवळ स्वेच्छापूर्वक परिसमापित होते तेव्हा, हे कलम लागू होणार नाही.

---

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ७ द्वारे घातले.

¹[भरपाई हा नियोक्त्याने हस्तांतरित केलेल्या मत्तेवरील पहिला प्रभार असणे. १४क. एखाद्या नियोक्त्याने आपली मत्ता हस्तांतरित करण्याच्या दिनांकापूर्वी एखाद्या भरपाई-बद्दलचे दायित्व प्रोद्भूत झाले असून त्याबाबत देय असलेली कोणतीही रक्कम देण्यात येण्यापूर्वीच ते हस्तांतरण झाले असेल तेव्हा, अशी रक्कम म्हणजे, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा तऱ्हेने हस्तांतरित केलेल्या मत्तेपैकी स्थावर संपत्तीच्या रूपात असलेल्या भागावरील पहिला प्रभार असेल.]

नौकाधिपती आणि खलाशी यांच्या संबंधी विशेष उपबंध १५. ²* * * जहाजांचे नौकाधिपती किंवा खलाशी असणाऱ्या कामगारांच्या बाबतीत पुढील फेरबदलांसह हा अधिनियम लागू होईल, ते असे :—

(१) अपघाताची नोटीस आणि भरपाईची मागणी ही, इजा पोचलेली व्यक्ती नौकाधिपती असल्यास तेवढी बाब खेरीजकरून इतर बाबतीत नौकाधिपतीवर, तो जणू काही नियोक्ता असावा त्याप्रमाणे बजावता येईल, पण जेव्हा जहाजावर अपघात घडून निःसमर्थता सुरू झाली असेल तेव्हा, कोणत्याही खलाशाने कोणतीही अपघाताची नोटीस देणे आवश्यक असणार नाही.

(२) नौकाधिपतीचा किंवा खलाशाचा मृत्यू घडला तर त्या बाबतीत, भरपाईसंबंधीची मागणी मागणीदाराला मृत्यूची बातमी कळल्यापासून ³[एक वर्षाच्या] आत किंवा जेव्हा एखादे जहाज त्यावरील सर्व खलाशांसहित बेपत्ता झाले असेल किंवा झाले असल्याचे मानले गेले असेल तेव्हा, ते अशा रीतीने ज्या दिनांकास बेपत्ता झाले किंवा झाल्याचे मानले गेले, त्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आत करावी लागेल :

⁴[परंतु, कोणत्याही प्रकरणी एखादी भरपाईची मागणी या पोटकलमामध्ये उपबंधित केल्या-प्रमाणे वाजवी वेळेत सादर केलेली नसली तरीही, जर मागणी याप्रमाणे सादर न करण्यास पुरेसे कारण होते अशी स्वतःची खात्री पटली तर, आयुक्ताला ती मागणी विचारार्थ स्वीकारता येईल.]

(३) जेव्हा इजा पोचलेल्या एखाद्या नौकाधिपतीस किंवा खलाशास ⁵[भारताच्या किंवा] हिज मॅजेस्टीच्या डोमिनिअन्सच्या कोणत्याही भागात किंवा ⁶[कोणत्याही परकीय देशात] कार्यमुक्त करण्यात किंवा मागे सोडून देण्यात आले असून त्या भागात कोणत्याही न्यायाधीशाने किंवा दंडाधिकाऱ्याने अथवा त्या परकीय देशात कोणत्याही वाणिज्यदूताने जबान्या घेतल्या असतील आणि ज्या व्यक्तीने त्या घेतल्या त्या व्यक्तीने त्या केंद्र शासनाकडे किंवा कोणत्याही राज्य शासनाकडे पाठवून दिल्या असतील तेव्हा—

(क) ज्याच्यासमोर जबानी दिली असेल तो न्यायाधीश, दंडाधिकारी, किंवा वाणिज्य-दूत यांच्या सहीने ती अधिप्रमाणित केलेली असेल तर ;

(ख) प्रतिवादीस किंवा, प्रकरणपरत्वे, आरोपी व्यक्तीस स्वतः किंवा स्वतःच्या अभिकर्त्यामार्फत साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची संधी मिळाली असेल तर ; आणि

(ग) फौजदारी कार्यवाहीच्या ओघात जबानी घेण्यात आली असल्यास, ती जबानी आरोपी व्यक्तीच्या समक्ष घेण्यात आली होती हे शाबीत झाले तर,

त्या जबान्या मागणी बजावून घेण्याबाबतच्या कोणत्याही कार्यवाहीत पुराव्यामध्ये ग्राह्य धरल्या जातील; आणि अशा कोणत्याही जबानीवर जिने सही केली असल्याचे दिसते त्या व्यक्तीची सही किंवा तिचे अधिकारस्थान कोणत्याही बाबतीत शाबीत करण्याची आवश्यकता असणार नाही आणि अशा व्यक्तीने जर, प्रतिवादीस किंवा आरोपी व्यक्तीस साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची संधी मिळाली होती आणि अशी जबानी फौजदारी कार्यवाहीच्या ओघात घेतली गेली असल्यास ती, आरोपी व्यक्तीच्या समक्ष घेतली गेली होती, अशा अर्थाचे प्रमाणपत्र दिलेले असेल तर, त्याला तशी संधी मिळाली होती याचा आणि ती जबानी तशा प्रकारे घेतली गेली होती याचा तो पुरेसा पुरावा ठरेल.

⁷* * * * * * *

⁸[(४)] व्यापारी नौवहनासंबंधी ⁹*** त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली ज्या कालावधीत जहाजाचा मालक इजा पोचलेल्या नौकाधिपतीचा किंवा खलाशाचा निर्वाहखर्च भागवण्यास दायी असेल त्या कालावधीबाबत कोणतेही ¹⁰[अर्धमासिक प्रदान] प्रदेय होणार नाही.

---

१. १९५९ चा अधिनियम ८, कलम १० द्वारे घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).
२. १९३३ चा अधिनियम १५, कलम १० द्वारे "नोंदलेल्या" हा शब्द गाळला.
३. १९५९ चा अधिनियम ८, कलम ११ द्वारे "सहा महिन्यांच्या" या शब्दांऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे जादा दाखल केले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).
५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे घातले.
६. १९८४ चा अधिनियम २२, कलम ४ द्वारे घातले.
७. १९३८ चा अधिनियम ९, कलम ७ द्वारे मूळ खंड (४) गाळला.
८. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे मूळ खंड (५) याला खंड (४) असा नवा क्रमांक दिला.
९. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग क राज्यांमध्ये आणि भाग ख राज्यांमध्ये" हा मजकूर गाळला.
१०. १९२४ चा अधिनियम ७, कलम २ व अनुसूची याद्वारे "मासिक प्रदान" या शब्दांऐवजी घातले.

[1][ (५) ज्याबाबतीत 'पेन्शन (नौसेना, भूसेना, वायुसेना व वाणिज्य नौधन) अधिनियम, १९३०' याखाली केलेली 'युद्धकालीन पेन्शन व स्थानबद्धता भत्ता (वाणिज्य नौधन, इ.) योजना, १९३९' किंवा युद्धकालीन पेन्शन व स्थानबद्ध भत्ता (भारतीय खलाशी, इ.) योजना, १९४१' याखाली किंवा केंद्र शासनाने केलेल्या 'युद्धकालीन पेन्शन व स्थानबद्धता भत्ता (भारतीय खलाशी) योजना, १९४२' याखाली उपदान, भत्ता किंवा पेन्शन देण्यासाठी उपबंध करण्यात आला आहे अशा कोणत्याही इजेच्या बाबतीत या अधिनियमाखालील कोणतीही भरपाई प्रदेय असणार नाही.

(६) कोणत्याही शारीरिक इजेबाबत या अधिनियमाखाली कार्यवाही चालविण्याच्या संबंधात जर—

(क) मागील खंडात उल्लेखिलेल्या योजनांपैकी कोणत्याही योजनेखाली त्या इजेच्या बाबतीत रक्कम मिळण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल, आणि

(ख) ज्या योजनेखाली अर्ज केला त्या योजनेत ज्यासंबंधात पैसे देण्याचा उपबंध आहे अशी ती इजा आहे अशा, वाजवी समजुतीने अर्ज करण्यात आला होता आणि ती इजा अशा प्रकारची इजा नसल्याच्या कारणावरून असा अर्ज फेटाळण्यात आला होता किंवा अर्जास अनुलक्षून करण्यात आलेली प्रदाने थांबवण्यात आली होती, असे राज्य शासनाने प्रमाणित केले तर, आणि

(ग) या अधिनियमाखालील कार्यवाही, ही राज्य शासनाचे उक्त प्रमाणपत्र कार्यवाही सुरू करणाऱ्या व्यक्तीला पुरविण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सुरू करण्यात आलेली असेल तर,

—या अधिनियमाद्वारे आवश्यक करण्यात आलेल्या मुदतीत नोटीस देण्यात किंवा मागणी करण्यात किंवा कार्यवाही सुरू करण्यात झालेल्या कसुरीमुळे ती कार्यवाही चालवण्यास आडकाठी होणार नाही.]

[2][ १५क. कप्तान किंवा विमानाच्या कर्मचारीगणाचे इतर सदस्य असणारे कामगार यांच्या बाबतीत हा अधिनियम पुढील फेरबदलांसह लागू होईल, ते असे :— कप्तान आणि विमानाच्या कर्मचारीगणाचे इतर सदस्य यांच्यासंबंधी विशेष उपबंध.

(१) अपघाताची नोटीस आणि भरपाईची मागणी ही, इजा पोचलेली व्यक्ती विमानाचा कप्तान असेल तेवढी बाब खेरीज करून इतर बाबतीत, विमानाच्या कप्तानावर, तो जणू काही नियोक्ता असावा त्याप्रमाणे बजावता येईल, पण जेव्हा विमानात अपघात घडून निःसमर्थता सुरू झाली असेल तेव्हा, कोणत्याही कर्मचारीगणाच्या सदस्याने कोणतीही अपघाताची नोटीस देणे आवश्यक असणार नाही.

(२) कप्तान किंवा इतर कर्मचारीगणाच्या सदस्याचा मृत्यू घडला तर त्या बाबतीत भरपाईसंबंधीची मागणी, मागणीदाराला मृत्यूची बातमी कळल्यापासून एक वर्षाच्या आत किंवा जेव्हा एखादे विमान त्यावरील सर्व कर्मचाऱ्यांसहित बेपत्ता झाले असेल किंवा झाले असल्याचे मानले गेले असेल तेव्हा, ते अशा रीतीने ज्या दिनांकास बेपत्ता झाले किंवा झाल्याचे मानले गेले त्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आत करावी लागेल :

परंतु, कोणत्याही प्रकरणी, एखादी भरपाईची मागणी या पोटकलमामध्ये उपबंधित केल्याप्रमाणे वाजवी वेळेत सादर केलेली नसली तरीही, जर मागणी याप्रमाणे सादर न करण्यास पुरेसे कारण होते, अशी आयुक्ताची खात्री पटली तर, तो ती मागणी स्वीकारू शकेल.

(३) जेव्हा इजा पोचलेल्या कप्तानास किंवा विमानाच्या कर्मचारीगणाच्या इतर सदस्यास भारताच्या कोणत्याही भागात किंवा अन्य कोणत्याही देशात कार्यमुक्त करण्यात किंवा मागे सोडून देण्यात आले असून त्या भागात कोणत्याही न्यायाधीशाने किंवा दंडाधिकाऱ्याने अथवा त्या परकीय देशात कोणत्याही वाणिज्यदूताने जबान्या घेतल्या असतील आणि ज्या व्यक्तीने त्या घेतल्या त्या व्यक्तीने त्या केंद्र शासनाकडे किंवा कोणत्याही राज्य शासनाकडे पाठवून दिल्या असतील त्याबाबतीत,—

(क) ज्याच्या समोर जबानी दिली असेल तो न्यायाधीश, दंडाधिकारी, किंवा वाणिज्य-दूत याच्या सहीने ती अधिप्रमाणित केलेली असेल तर ;

(ख) प्रतिवादीस, किंवा प्रकरणपरत्वे, आरोपी व्यक्तीस स्वतः किंवा स्वतःच्या अभिकर्त्यामार्फत साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची संधी मिळाली असेल तर; आणि

(ग) फौजदारी कार्यवाहीच्या ओघात जबानी घेण्यात आली असल्यास, ती जबानी आरोपी व्यक्तीच्या समक्ष घेण्यात आली होती, हे शाबीत झाले तर,

—त्या जबान्या मागणी बजावून घेण्याबाबतच्या कोणत्याही कार्यवाहीत पुराव्यामध्ये ग्राह्य धरल्या जातील; आणि अशा कोणत्याही जबानीवर जिने सही केली असल्याचे दिसते त्या व्यक्तीची सही किंवा तिचे अधिकारस्थान कोणत्याही बाबतीत शाबीत करण्याची आवश्यकता असणार नाही आणि अशा व्यक्तीने जर प्रतिवादीस किंवा आरोपी व्यक्तीस साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची संधी मिळाली होती आणि अशी जबानी फौजदारी कार्यवाहीच्या ओघात घेतली गेली असल्यास, ती आरोपी व्यक्तीच्या समक्ष घेतली गेली होती, अशा अर्थाचे प्रमाणपत्र दिलेले असेल तर, त्याला तशी संधी मिळाली होती याचा आणि ती जबानी तशा प्रकारे घेतली गेली होती याचा तो पुरेसा पुरावा ठरेल.

---

१. १९३९ चा अधिनियम ४२, कलम २ द्वारे समाविष्ट केलेल्या (३ सप्टेंबर, १९३९ रोजी व तेव्हापासून) खंडाऐवजी १९४२ चा अधिनियम, १ कलम २ द्वारे खंड (५) घातला.

२. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ८ द्वारे घातले.

परदेशी कंपन्यातील कामगार आणि मोटार वाहन यांच्याशी संबंधित विशेष उपबंध.

१५ख. हा अधिनियम—

(एक) भारतात नोंदणी करण्यात आलेल्या कंपन्यांनी भरती केलेल्या आणि परदेशात कामगार म्हणून काम करीत असलेल्या कामगारांच्या बाबतीत, आणि

(दोन) मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याखाली नोंदणी करण्यात आलेल्या मोटार वाहनांसह, परदेशात चालक, मदतनीस, यांत्रिक, स्वच्छक किंवा अन्य कामगार म्हणून काम करण्यासाठी पाठवण्यात आलेल्या व्यक्तींच्या बाबतीत, पुढील फेरबदलांच्या अधीनतेने, लागू होईल ते फेरबदल असे :—

(१) अपघाताची आणि भरपाईच्या मागणीची नोटीस ही कंपनीच्या स्थानिक अभिकर्त्यावर किंवा, प्रकरणपरत्वे, मोटार वाहनाच्या मालकाच्या, अपघात घडून आलेल्या देशातील स्थानिक अभिकर्त्यावर बजावता येईल.

(२) ज्याला या कलमांचे उपबंध लागू होतील त्या कामगाराच्या मृत्यूच्या बाबतीत, मागणीदाराकडून भरपाईची मागणी त्याला मृत्यूची बातमी कळल्यापासून एक वर्षाच्या आत करण्यात यईल:

परंतु, कोणत्याही प्रकरणी, एखादी भरपाईची मागणी या पोटकलमामध्ये उपबंधित केल्याप्रमाणे बाजवी वेळेत सादर केलेली नसली तरी, जर मागणी याप्रमाणे सादर न करण्यास पुरेसे कारण होते अशी आयुक्ताची खात्री पटल्यास, आयुक्त ती मागणी स्वीकारु शकेल.

(३) जेव्हा इजा पोचलेल्या कामगारास भारताच्या कोणत्याही भागात किंवा अन्य कोणत्याही देशात कार्यमुक्त करण्यात किंवा मागे सोडून देण्यात आले असून त्या भागातील कोणत्याही न्यायाधीशाने किंवा दंडाधिकाऱ्याने अथवा त्या परकीय देशातील कोणत्याही वाणिज्यदूताने जबान्या घेतल्या असतील आणि ज्या व्यक्तीने त्या घेतल्या त्या व्यक्तीने केंद्र शासनाकडे किंवा कोणत्याही राज्य शासनाकडे त्या पाठवून दिल्या असतील त्याबाबतीत—

(क) ज्याच्यासमोर जबानी दिली असेल तो न्यायाधीश, दंडाधिकारी किंवा वाणिज्यदूत यांच्या सहीन ती अधिप्रमाणित केलेली असेल तर ;

(ख) प्रतिवादीस किंवा, प्रकरणपरत्वे, आरोपी व्यक्तीस स्वत: किंवा स्वत:च्या अभिकर्त्यामार्फत साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची संधी मिळाली असेल तर ;

(ग) फौजदारी कार्यवाहीच्या ओघात जबानी घेण्यात आली असल्यास ती जबानी आरोपी व्यक्तीच्या समक्ष घेण्यात आली होती हे शाबीत झाले तर,

—त्या जबान्या मागणो बजावून घेण्याबाबतच्या कोणत्याही कार्यवाहीत पुराव्यामध्ये ग्राह्य धरल्या जातील; आणि अशा कोणत्याही जबानीवर जिने सही केली असल्याचे दिसते त्या व्यक्तीची सही किंवा तिचे अधिकारस्थान कोणत्याही बाबतीत शाबीत करण्याची आवश्यकता असणार नाही आणि अशा व्यक्तीने जर प्रतिवादीस किंवा आरोपी व्यक्तीस साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची संधी मिळाली होती आणि अशी जबानी फौजदारी कार्यवाहीच्या ओघात घेतली गेली असल्यास ती, आरोपी व्यक्तीच्या समक्ष घेतली गेली होती अशा अर्थाचे प्रमाणपत्र दिलेले असेल तर, त्याला तशी संधी मिळाली होती याचा आणि ती जबानी तशा प्रकारे घेतली गेली होती याचा तो पुरेसा पुरावा ठरेल.]

भरपाई संबंधीची प्रतिवेदने.

१६. [१][राज्य शासन], शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, कामगारांना कामावर ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गातील अशा व्यक्तींनी, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळी व अशा नमुन्यात आणि अशा प्राधिकरणाकडे, मागील वर्षी नियोक्त्याने किती इजांच्या बाबतीत भरपाई दिली ती संख्या व अशा भरपाईची रक्कम आणि सोबत, [१][राज्य शासन] निदेशित करील असा भरपाईसंबंधीचा अन्य तपशील विनिर्दिष्ट करणारे यथातथ्य प्रतिवेदन पाठवावे.

संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे.

१७. कामधंद्यामुळे किंवा त्याच्या ओघात उद्‌भवणाऱ्या कोणत्याही शारीरिक इजेबद्दल नियोक्त्याकडून भरपाई मिळण्याचा कोणताही अधिकार कामगार ज्याद्वारे सोडून देतो अशी कोणतीही संविदा किंवा करार, मग तो या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर करण्यात आलेला असो, त्याद्वारे, या अधिनियमाखाली भरपाई देण्याचे कोणत्याही व्यक्तीचे दायित्व दूर करणे किंवा कमी करणे अभिप्रेत असेल तेथवर रद्दबातल असेल.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० व अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ शब्दाऐवजी घातले.

१८. [वयाचा पुरावा.] 'कामगार भरपाई (विशोधन) अधिनियम, १९५९' (१९५९ चा ८) कलम १२ याद्वारे निरसित (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

[१][१८क. (१) जो कोणी— दंड.

(क) कलम १० पोटकलम (३) खाली त्याने जे नोटीस-पुस्तक राखणे आवश्यक आहे ते राखण्यास चुकेल, किंवा

(ख) कलम १०क पोटकलम (१) खाली त्याने आयुक्ताकडे जे विवरणपत्र पाठवणे आवश्यक आहे ते पाठवण्यास चुकेल, किंवा

(ग) कलम १०ख खाली त्याने जे प्रतिवृत्त पाठवणे आवश्यक आहे ते पाठवण्यास चुकेल, किंवा

(घ) कलम १६ खाली त्याने जे प्रतिवेदन करणे आवश्यक होते ते करण्यास चुकेल, तो [२][पाच हजार रुपयांपर्यंत] असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(२) आयुक्त खेरीजकरून किंवा त्याच्या पूर्वमंजुरीखेरीज कोणालाही या कलमाखाली कोणताही खटला भरता येणार नाही, आणि कोणतेही न्यायालय या कलमाखालील कोणत्याही अपराधाबाबत [३][अपराध घडल्याचे अभिकथित वृत्त आयुक्तास माहीत झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत] तक्रार करण्यात आल्याशिवाय त्या अपराधाची दखल घेणार नाही.]

## प्रकरण तीन

### आयुक्त

१९. (१) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत जर भरपाई देण्याबाबत कोणत्याही व्यक्तीवरील दायित्वासंबंधी (इजा पोहोचलेली व्यक्ती ही कामगार आहे किंवा नाही यासंबंधीचा कोणताही प्रश्न धरून) अथवा भरपाईची रक्कम किंवा कालावधी यासंबंधी (निःसमर्थतेचे स्वरूप किंवा व्याप्ती यासंबंधातील कोणताही प्रश्न धरून) कोणताही प्रश्न उद्भवला तर, संमतीकराराअभावी तो प्रश्न [४][एखाद्या आयुक्ताकडून] मिटवण्यात येईल. आयुक्तांकडे निर्देशन.

(२) आयुक्ताने जो प्रश्न मिटवावा, ज्यावर निर्णय द्यावा किंवा कार्यवाही करावी असे या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक करण्यात आले आहे असा कोणताही प्रश्न मिटवण्यास, त्यावर निर्णय देण्यास किंवा कार्यवाही करण्यास अथवा या अधिनियमाखाली ओढवलेल्या कोणत्याही दायित्वाची बजावणी करण्यास कोणत्याही दिवाणी न्यायालयास अधिकारिता असणार नाही.

२०. (१) राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणतीही व्यक्ती त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा [५]* * * * क्षेत्राकरता श्रमिक भरपाई आयुक्त म्हणून नियुक्त करता येईल. आयुक्तांची नियुक्ती.

[६][(२) कोणत्याही [५]* * * क्षेत्राकरता एकाहून अधिक आयुक्त नियुक्त करण्यात आले असतील त्याबाबतीत, राज्य शासनास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्यांच्यातील कामकाजाच्या विभागणीचे विनियमन करता येईल.]

[७][(३)] कोणत्याही आयुक्तास, या अधिनियमाखाली त्याच्याकडे निर्णयार्थ निर्देशित केलेल्या कोणत्याही बाबीवर निर्णय देण्यासाठी, चौकशी चालवताना आपणास मदत व्हावी म्हणून चौकशीतील प्रकरणाशी संबद्ध अशा कोणत्याही बाबीचे विशेष ज्ञान असणाऱ्या एका किंवा त्याहून अधिक व्यक्तींची निवड करता येईल.

[७][(४)] प्रत्येक आयुक्त हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९३३ चा अधिनियम १५, कलम ११ द्वारे घातले.

२. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ९ द्वारे 'पाचशे' या शब्दाऐवजी घातले.

३. १९६२ चा अधिनियम ६४, कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

४. १९३३ चा अधिनियम १५, कलम १२ द्वारे "आयुक्ताकडून" या शब्दाऐवजी घातले.

५. १९६२ चा अधिनियम ६४, कलम ७ द्वारे "स्थानिक" हा शब्द गाळला (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

६. १९३३ चा अधिनियम १५, कलम १३ द्वारे घातले.

७. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे मूळ पोटकलमे (२) व (३) यांना पोटकलमे (३) व (४) असे नवीन क्रमांक दिले.

कार्यवाहीचे स्थळ आणि ती वर्ग करणे. २१. [1][ (१) या अधिनियमाखालील कोणतीही गोष्ट आयुक्ताने किंवा आयुक्तासमोर करावयाची असेल तर, या अधिनियमाच्या उपबंधाच्या आणि त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने :—

(क) ज्यामुळे इजा झाली तो अपघात ज्या क्षेत्रात घडला असेल; किंवा

(ख) कामगाराचा किंवा, तो मरण पावला असेल त्या बाबतीत, भरपाईची मागणी करणाऱ्या अवलंबित व्यक्तीचा निवास सामान्यपणे ज्या क्षेत्रात असेल; किंवा

(ग) ज्या क्षेत्रात नियोक्त्याचे नोंदणीकृत कार्यालय असेल,

त्या क्षेत्राच्या आयुक्ताला किंवा त्याच्यासमोर ती गोष्ट करावी लागेल :

परंतु, जेथे अपघात घडला असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या आयुक्ताहून अन्य आयुक्तासमोर किंवा आयुक्ताला, कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत, त्याने त्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या आयुक्ताला किंवा संबंधित राज्य शासनाला, केन्द्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात नोटीस दिल्याशिवाय त्या बाबीवर कार्यवाही करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, जहाजाचा नौकाधिपती किंवा खलाशी असणाऱ्या किंवा विमानाच्या कर्मचारी गणाचा कप्तान असणाऱ्या किंवा सदस्य असणाऱ्या किंवा मोटार वाहनात किंवा कंपनीत काम करणाऱ्या कामगाराला भारताबाहेर अपघात झाला असेल त्याबाबतीत, अशी कोणतीही गोष्ट, त्या जहाजाचा, विमानाचा किंवा मोटार वाहनाचा मालक किंवा अभिकर्ता ज्या क्षेत्रात निवास करीत असेल किंवा कामधंदा चालवित असेल किंवा प्रकरणपरत्वे, कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय स्थित असेल, त्या क्षेत्राच्या आयुक्ताला किंवा आयुक्तासमोर करावी लागेल.

(१क) कलम ८ खाली, ज्या आयुक्ताकडे कोणताही पैसा जमा करण्यात येत असेल त्या आयुक्ताहून अन्य आयुक्ताने या अधिनियमान्वये एखाद्या गोष्टीवर कार्यवाही केल्यास, तो आयुक्त ती बाब योग्य रीतीने निकालात काढण्यासाठी पैसे जमा करण्यात येणाऱ्या आयुक्ताकडे असलेले कोणतेही अभिलेख किंवा पैसा त्याच्याकडे वर्ग करण्याची मागणी करू शकेल आणि तशी विनंती करण्यात आल्यावर, तो, तिचे अनुपालन करील.]

(२) आपणासमोर [2][प्रलंबित असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमधून उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबीवर] अन्य कोणत्याही आयुक्ताने—मग तो त्याच राज्यातील असो वा नसो—कार्यवाही करणे अधिक सोईस्कर होऊ शकेल, अशी जर एखाद्या आयुक्ताची खात्री झाली तर तो, या अधिनियमाखाली केलेल्या नियमाच्या अधीनतेने, अशी बाब अहवालाकरता किंवा निकालात काढण्याकरता अशा अन्य आयुक्ताकडे वर्ग करण्याचा आदेश देऊ शकेल, आणि, जर त्याने तसे केले तर, अशा बाबीवर निर्णय देण्याच्या दृष्टिने संबद्ध अशी सर्व कागदपत्रे तो अशा अन्य आयुक्ताकडे ताबडतोब पाठवील आणि, ती बाब निकालात काढली जाण्यासाठी वर्ग करण्यात आली असेल तर, आपल्या हाती शिल्लक असलेला किंवा कार्यवाहीतील कोणत्याही पक्षकाराच्या फायद्यासाठी गुंतवलेला कोणताही पैसादेखील विहित पद्धतीने त्याच्याकडे पाठवून देईल :

[3][परंतु, कार्यवाहीतील पक्षकार आपणासमोर हजर झाला असेल तर, आयुक्त अशा पक्षकाराला आपली बाजू मांडण्याची संधी न देता, त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींमध्ये ठोक रकमेची विभागणी करण्यासंबंधीची बाब वर्ग करण्याचा कोणताही आदेश देणार नाही.]

[4][ * * * * ]

(३) ज्याच्याकडे याप्रमाणे कोणतीही बाब वर्ग करण्यात आली असेल तो आयुक्त, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांच्या अधीनतेने, त्या बाबीची चौकशी करील आणि, ती बाब अहवालासाठी वर्ग करण्यात आली असेल तर, त्यावर आपला अहवाल देईल, किंवा जर ती बाब निकालात काढण्याकरता वर्ग करण्यात आली असेल तर, ती कार्यवाही जणू काही मुळात त्याच्यासमोर सुरू झालेली असावी त्याप्रमाणे ती पुढे चालू करील.

(४) पोटकलम (२) खाली कोणतीही बाब ज्याच्याकडे अहवालासाठी वर्ग करण्यात आली होती अशा आयुक्ताकडून अहवाल मिळाल्यावर, ज्याने ती निर्देशित केली होती तो आयुक्त, निर्देशित करण्यात आलेल्या बाबीच्या अशा अभिप्रायानुरूप निर्णय करील.

[5][(५) राज्य शासनास कोणतीही बाब आपण नियुक्त केलेल्या कोणत्याही आयुक्ताकडून आपण नियुक्त केलेल्या अन्य कोणत्याही आयुक्ताकडे वर्ग करता येईल.]

अर्जाचा नमुना. २२. [6][ (१) ज्या बाबतीत या अधिनियमान्वये भरपाई चुकती करण्याचे दायित्व उद्‌भवले असेल त्या अपघाताच्या बाबतीत, या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, अशा भरपाईसाठी आयुक्तासमोर मागणी करता येईल.

---

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १० (एक) द्वारे घातले.

२. १९३८ चा अधिनियम ९, कलम ९ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे घातले.

४. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १० (दोन) द्वारे परंतुक गाळले.

५. १९३३ चा अधिनियम १५, कलम १४ द्वारे घातले.

६. १९९५ चा अधिनियम ३०, कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(१क) कोणतीही बाब आयुक्ताने मिटवावी म्हणून पोट कलम (१) च्या उपबंधाच्या अधीनतेने करावयाचा असा, [१][भरपाईसाठी अवलंबित व्यक्तीने किंवा व्यक्तींनी केलेला अर्ज सोडून] अन्य अर्ज, जो प्रश्न पक्षकार संमतिपत्राद्वारे मिटवण्यास असमर्थ आहेत असा एखादा प्रश्न त्यासंबंधात उद्भवल्याशिवाय व उद्भवेपर्यंत करता येणार नाही.]

(२) [२][आयुक्ताकडे करावयाचा अर्ज] विहित करण्यात येईल अशा नमुन्यात करता येईल आणि त्यासोबत, विहित केलेली असेल तशी फी द्यावी लागेल, आणि अशा अर्जात विहित अशा कोणत्याही तपशिलाव्यतिरिक्त आणखी पुढील तपशिलाचा समावेश असेल, तो असा :—

(क) अर्ज कोणत्या परिस्थितीत करण्यात आला आणि अर्जदार कोणत्या अनुतोषाची किंवा आदेशाची मागणी करीत आहे त्याबाबतचे संक्षिप्त निवेदन ;

(ख) भरपाईसाठी नियोक्त्याविरुद्ध मागणी दाखल करण्यात आली असेल अशा प्रकरणी, अपघाताची नोटीस नियोक्त्यावर ज्या दिनांकास बजावण्यात आली तो दिनांक आणि जर अशी नोटीस बजावण्यात आली नसेल किंवा योग्य वेळी बजावण्यात आली नसेल तर, असे न करण्याचे कारण ;

(ग) पक्षकारांची नावे व पत्ते; आणि

(घ) [३][भरपाईसाठी अवलंबित व्यक्तींनी केलेले अर्ज खेरीजकरून अन्य प्रकरणी] ज्यांबाबत मतैक्य झाले असेल त्या आणि ज्यांबाबत मतैक्य झाले नसेल [४][त्या बाबींचे] संक्षिप्त विवरण.

(३) जर अर्जदार हा, अशिक्षित असेल किंवा कोणत्याही कारणामुळे आवश्यक ती माहिती लेखी पुरवण्यास तो असमर्थ असेल तर, तो अर्ज, अर्जदाराची तशी इच्छा असल्यास, आयुक्ताच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात येईल.

[५][२२क. (१) इजेमुळे ज्याचा मृत्यू झाला अशा कामगाराच्या बाबतीत प्रदेय असलेली भरपाई म्हणून नियोक्त्याने कोणतीही रक्कम जमा केली असेल, आणि आयुक्ताच्या मते अशी रक्कम अपुरी असेल तेव्हा, आयुक्त नोटीस काढून व तीत आपली कारणे लेखी नमूद करून त्या नोटिशीद्वारे, नोटिशीत नमूद करण्यात येईल अशा मुदतीत नियोक्त्याने आणखी रक्कम जमा का करू नये याबद्दलचे कारण दाखवण्यास त्याला फर्मावू शकेल. प्राणांतिक अपघाताच्या प्रकरणी आणखी रक्कम जमा करण्यास फर्मावण्याची आयुक्ताची शक्ती.

(२) जर आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने कारण दाखवण्यास नियोक्ता चुकला तर आयुक्त प्रदेय असलेली एकूण रक्कम निश्चित करणारा, आणि नियोक्त्यास तुटीच्या रकमेचा भरणा करण्याबाबत फर्मावणारा निवाडा देऊ शकेल.]

**२३.** आयुक्ताला शपथेवर पुरावा घेण्यासाठी (ते बंधन लादण्यास अशा आयुक्ताला याद्वारे शक्ती प्रदान झाली आहे) आणि साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी व दस्तऐवज आणि महत्त्वाच्या वस्तू हजर करण्याची सक्ती करण्यासाठी 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली दिवाणी न्यायालयाला असलेल्या सर्व शक्ती असतील, [६][आणि आयुक्त हा [७][ 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याचे कलम १९५ व प्रकरण सव्विसावे] यांच्या प्रयोजनार्थ दिवाणी न्यायालय असल्याचे मानले जाईल.] आयुक्तांच्या शक्ती व त्यांची कार्यपद्धती.

[८][२४. कोणत्याही व्यक्तीने आयुक्तासमोर किंवा त्याच्याकडे उपस्थित राहणे (साक्षीदार म्हणून एखाद्या पक्षकाराची तपासणी होण्यासाठी त्याने उपस्थित व्हावयाचे असेल ती बाब सोडून) किंवा अर्ज करणे किंवा एखादी कृती करणे आवश्यक असेल तेव्हा, अशा व्यक्तीच्या वतीने, जो विधिव्यवसायी अथवा एखाद्या विमा कंपनीचा किंवा नोंदलेल्या व्यवसाय संघाचा अधिकारी अथवा 'कारखाने अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३) कलम ८, पोट कलम (१) खाली किंवा 'खाण अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५) कलम ५, पोटकलम (१) खाली नियुक्त केलेला निरीक्षक असेल अथवा याबाबतीत राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेला अन्य कोणताही अधिकारी लेखी प्राधिकृत केला असेल त्याला अथवा आयुक्ताच्या परवानगीने याप्रमाणे प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला ती कृती करता येईल.] पक्षकारांची उपस्थिती.

**२५.** साक्षीदाराची तपासणी जसजशी होत जाईल तसतसे आयुक्त, प्रत्येक साक्षीदाराच्या पुराव्याच्या आशयाचे थोडक्यात टाचण तयार करील, आणि असे टाचण आयुक्त स्वतः हाताने लिहून काढील व त्यावर स्वाक्षरी करील आणि ते त्या कामाच्या कागदपत्रांचा एक भाग होईल : पुरावा नोंदण्याची पद्धती.

---

१. १९३३ चा अधिनियम १५, कलम १५ द्वारे घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे 'जेथे असा कोणताही प्रश्न उद्भवला असेल तेथे तो अर्ज' या शब्दांऐवजी घातले.

३. १९३६ चा अधिनियम १५, कलम १५ द्वारे घातले.

४. १९२५ चा अधिनियम ३७, कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे "त्या बाबींवर" या शब्दांऐवजी घातले.

५. १९३३ चा अधिनियम १५, कलम १६ द्वारे घातले.

६. १९२९ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे जादा दाखल करण्यात आले.

७. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

८. १९५९ चा अधिनियम ८, कलम १४ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून)

(च्) जे अज्ञान आहेत किंवा जे उपस्थित होण्यास असमर्थ आहेत अशा पक्षकारांचे आयुक्ता-पुढील कार्यवाहीत प्रतिनिधित्व ;

(छ्) संमतिपत्रांच्या याद्या कोणत्या नमुन्यात व कशा रीतीने सादर करण्यात व नोंदवण्यात याव्या ते विहित करणे ;

(ज्) अर्धमासिक प्रदानांचे पुर्नविलोकन करण्याबाबतच्या अर्जांवरील निर्णय प्रलंबित असेतोवर आयुक्तांनी ती प्रदाने संपूर्णतः किंवा अंशतः रोखून ठेवणे ; [१]* * *

[१]* * * * *

[२][(झ्) या अधिनियमाखालील कार्यवाहीमध्ये जो खर्च देववता येईल त्यांच्या दरांच्या श्रेणी विनियमित करणे ;

(ञ्) या अधिनियमाखाली आयुक्तापुढे होणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीत प्रदेय असलेल्या फीची रक्कम विहित करणे व ठरविणे ;

(ट्) आयुक्तांनी नोंदपुस्तके व आपणांपुढे असलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे राखणे ;

(ठ्) कोणत्या वर्गातील नियोक्त्यांनी कलम १०, पोटकलम (३) खाली नोटीस-पुस्तके ठेवली पाहिजेत ते वर्ग, व अशा नोटीस-पुस्तकांचा नमुना विहित करणे ;

(ड्) कलम १०क खाली नियोक्त्यांनी सादर करावयाच्या विवरणाचा नमुना विहित करणे;

[३]* * * * *

(ढ्) कोणत्या प्रकरणी कलम १०ख मध्ये उल्लेखिलेला अहवाल आयुक्ताहून अन्य प्राधि-करणाकडे पाठवावा, ते विहित करणे ; ]

[४][(ण्) या अधिनियमातील गोषवारे विहित करणे व असे गोषवारे अंतर्भूत असलेल्या नोटिसा लावणे, हे नियोक्त्यांना आवश्यक करणे ;

(त्) व्यवसायजन्य रोग म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या रोगांचे निदान कशा रीतीने करावे, ते विहित करणे ;

(थ्) या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरता रोगाबाबत कशा रीतीने प्रमाणपत्र द्यावे, ते विहित करणे ;

(द्) अक्षमता कशा रीतीने व कोणत्या मानकांच्या आधारे ठरवावी, ते विहित करणे.]

[५][(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो, करण्यात आल्यानंतर ताबडतोब, राज्य विधान-मंडळासमोर मांडण्यात येईल].

३३. [स्थानिक शासनाची नियम करण्याची शक्ती] अनुकलन आदेश, १९३७ द्वारे निरसित.

नियम प्रकाशित करणे. ३४. (१) [६][कलम ३२] द्वारे प्रदान केलेली नियम करण्याची शक्ती, ते नियम अगोदर प्रकाशित करून नंतर केले पाहिजेत, या शर्तीस अधीन असेल.

(२) कलम ३२[७]* * * खाली जे नियम करण्याचे प्रस्तावित आहे त्याचा मसुदा ज्या दिनांकानंतर विचारात घेतला जाणार असा, 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा १०) कलम २३-खंड (३) अनुसार विनिर्दिष्ट करावयाचा दिनांक हा, प्रस्तावित नियमांचा मसुदा सर्वांच्या माहितीसाठी ज्या दिनांकास प्रकाशित करण्यात आला असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आतला असणार नाही.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे खंड (ज्) च्या अखेरचा "आणि" हा शब्द व मूळ खंड (झ्) गाळला.

२. वरील आदेशाद्वारे कलम ३३ चे खंड (क्) ते (च्) यांना खंड (झ्) ते (ढ्) हे नवीन क्रमांक देऊन ते कलम ३२ मध्ये समाविष्ट केले व कलम ३३ चा उर्वरित भाग गाळला.

३. १९६० चा अधिनियम ५८ कलम ३ व दुसरी अनुसूची यांद्वारे "आणि" हा शब्द गाळला.

४. १९५९ चा अधिनियम ८, कलम १६ द्वारे घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

५. १९८६ चा अधिनियम ४, कलम २ आणि दुसऱ्या अनुसूचीद्वारे घातले (१५ मे, १९८६ रोजी व तेव्हापासून).

६. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "कलमे ३२ व ३३" या शब्दांऐवजी घातले.

७. वरील आदेशाद्वारे "किंवा कलम ३३" हे शब्द व आकडे गाळले.

(३) अशा प्रकारे केलेले नियम [1] * * * [2] * * * * शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येतील आणि अशा प्रकाशनानंतर ते जणू काही या अधिनियमात अधिनियमित करण्यात आलेले असावेत अशा प्रकारे परिणामक होतील.

भरपाई म्हणून दिलेले पैसे हस्तांतरित करण्याबाबत इतर देशांबरोबर केलेल्या व्यवस्था अंमलात आणण्यासाठी नियम.

[3][ ३५. [4][ (१) ][5]**** [6][कोणत्याही परकीय देशात] राहणाऱ्या किंवा राहावयास जाण्याच्या बेतात असलेल्या कोणत्याही [7][व्यक्तीला निवाड्याने देववलेला किंवा देय असलेला] जो पैसा या अधिनियमाखाली आयुक्ताकडे [8][जमा केलेला] असेल तो अशा [9][परकीय देशाकडे] हस्तांतरित करण्यासाठी अथवा [10][कोणत्याही राज्यात] राहणाऱ्या किंवा राहावयास जाण्याच्या बेतात असणाऱ्या [11][कोणत्याही व्यक्तीला निवाड्याने देववलेला किंवा तिला देय असलेला] जो कोणताही पैसा [12]**** [13]**** [6][कोणत्याही परकीय देशात] कामगार भरपाईसंबंधीच्या कायद्याखाली [14][जमा केलेला] असेल तो [10][कोणत्याही राज्यात] स्वीकारणे [15][वितरित करणे] व त्याचे प्रशासन करणे यासाठी केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील :]

[15][परंतु, प्राणांतिक अपघातांच्या बाबतीत या अधिनियमाखाली जमा केलेली कोणतीही रक्कम, ज्याच्याकडे ती आली तो आयुक्त कलम ८, पोटकलम (४) व (५) यांच्या उपबंधाखाली तिचे वितरण व संविभाजन कसे करावयाचे हे ठरवणारे आदेश देईपर्यंत, संबंधित नियोक्त्याच्या संमतीवाचून, याप्रमाणे पाठवून देण्यात येणार नाही.

(२) आयुक्ताकडे जमा केलेला पैसा, या कलमाखाली केलेल्या नियमांनुसार याप्रमाणे पाठवून देण्यात आलेला असेल त्याबाबतीत, आयुक्ताकडे जमा केलेल्या भरपाईच्या रकमेचे त्याने वितरण करण्यासंबंधात या अधिनियमात अन्यत्र केलेले उपबंध अशा कोणत्याही पैशाच्या संबंधात लागू होण्याचे बंद होईल.]

केंद्र शासनाने केलेले नियम संसदेपुढे ठेवणे.

[16][ ३६. या अधिनियमाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन [17][किंवा अधिक] क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि [17][पूर्वोक्त सत्राच्या किंवा सत्रांच्या लागोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर] त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबावत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गॅझेट ऑफ इंडियामध्ये किंवा" हे शब्द गाळले.

२. वरील आदेशाद्वारे "प्रकरणपरत्वे" हा शब्द गाळला.

३. १९३३ चा अधिनियम १५, कलम २० द्वारे घातले.

४. १९३७ चा अधिनियम ७, कलम २ द्वारे कलम ३५ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला.

५. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे "कोणत्याही भाग ख राज्यात किंवा" हा मजकूर गाळला.

६. १९८४ चा अधिनियम २२, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ जुलै, १९८४ रोजी व तेव्हापासून).

७. १९३७ चा अधिनियम ७, कलम २ द्वारे "व्यक्तीच्या फायद्यासाठी" या शब्दाऐवजी घातले.

८. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "भरणा केलेला" या शब्दाऐवजी घातले.

९. १९८४ चा अधिनियम २२, कलम ५ द्वारे, "अशा भागाकडे किंवा देशाकडे" या शब्दांऐवजी घातले.

१०. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग क राज्यात किंवा भाग ग राज्यात" याऐवजी घातले.

११. १९३७ चा अधिनियम, ७ कलम २ द्वारे "कोणत्याही व्यक्तीच्या फायद्यासाठी उपयोजित करावयाचा" याऐवजी घातले.

१२. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूचीद्वारे "कोणत्याही भाग ख राज्यात" हे शब्द गाळले.

१३. १९५७ चा अधिनियम ३६, कलम ३ व दुसरी अनुसूची यांद्वारे "किंवा" हा शब्द गाळला.

१४. १९३७ चा अधिनियम ७, कलम २ द्वारे "निवाड्याने देववलेला" या ऐवजी घातले.

१५. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे घातले.

१६. १९६२ चा अधिनियम ६४, कलम ८ द्वारे घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

१७ १९७६ चा अधिनियम ६५, कलम ३ द्वारे घातले.

[१][अनुसूची पहिली

[कलमे २(१) व ४ पहा]

| अनुक्रमांक | इजेचे वर्णन | अर्थार्जनक्षमतेच्या हानीची टक्केवारी |
|---|---|---|
| | [२][भाग पहिला | |
| | ज्यांमधून कायमची संपूर्ण निःसमर्थता निष्पन्न झाली असे मानले जाते अशा इजांची यादी] | |
| १ | दोन्ही हात गमावणे किंवा बऱ्याच वरपासून कापावे लागणे .. .. | १०० |
| २ | एक हात व एक पाऊल गमावणे .. .. .. | १०० |
| ३ | तंगडीपासून किंवा मांडीपासून दोन्ही पाय कापावे लागणे अथवा एक पाय तंगडीपासून किंवा मांडीपासून कापावा लागणे व दुसऱ्या पायाचे पाऊल गमावणे | १०० |
| ४ | ज्याकरिता दृष्टी अत्यावश्यक आहे असे कोणतेही काम करण्यास मागणीदार असमर्थ ठरेल इतपत दृष्टी गमावणे | १०० |
| ५ | चेहरा अत्यंत भयानकरीत्या विद्रूप होणे .. .. .. | १०० |
| ६ | ठार बहिरेपणा येणे .. .. .. .. | १०० |
| | [३][भाग दुसरा | |
| | ज्यांमधून कायमची आंशिक निःसमर्थता निष्पन्न झाली असे मानले जाते अशा इजांची यादी]. | |
| | **अवयव-उच्छेदनाची प्रकरणे—हात (दोहोंपैकी एक)** | |
| [४][१ | खांद्याच्या सांध्यामधून कापावा लागणे .. .. | ९० |
| २ | अंसकूटाच्या टोकापासून [५][२०.३२ सें. मी.] पेक्षा कमी खुंट शिल्लक राहील अशाप्रकारे कापावा लागणे | ८० |
| ३ | अंसकूटाच्या टोकापासून [५][२०.३२ सें.मी.] च्या पलिकडे ते कोपरहाडाच्या टोकाखाली [५][११.४३ सें.मी.] पेक्षा कमी इतका कापावा लागणे .. .. | ७० |
| ४ | एक पंजा किंवा एका पंजाचा अंगठा व चार बोटे गमावणे अथवा कोपरहाडाच्या टोकाखालील [५][११.४३ सें.मी.] च्या पलिकडे कापावा लागणे | ६० |
| ५ | अंगठा गमावणे .. .. .. .. | ३० |
| ६ | अंगठा व त्याचे चवडयाचे हाड गमावणे .. .. .. | ४० |
| ७ | एका पंजाची चार बोटे गमावणे .. .. .. | ५० |
| ८ | एका पंजाची तीन बोटे गमावणे .. .. .. .. | ३० |
| ९ | एका पंजाची दोन बोटे गमावणे .. .. .. | २० |
| १० | अंगठयाचे शेवटचे पेराचे हाड गमावणे .. .. .. | २० |
| [६][१०क | हाड न गमावता अंगठयाचे टोक गिलोटिनने छाटावे लागणे | १०] |
| | **अवयव-उच्छेदनाची प्रकरणे—पाय** | |
| ११ | फक्त टाचा उरतील इतपत दोन्ही पावले कापावी लागणे .. .. | ९० |
| १२ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्याच्या अलिकडे दोन्ही पावले कापावी लागणे .. | ८० |
| १३ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्यांमधून दोन्ही पावलांची सर्व बोटे कापावी लागणे | ४० |
| १४ | बोटांच्या पेरांमधील पहिल्या सांध्याच्या अलिकडे दोन्ही पावलांची सर्व बोटे कापावी लागणे | ३० |

१. १९५९ चा अधिनियम ८, कलम १७ द्वारे मूळ अनुसूचीऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

२. १९६२ चा अधिनियम ६४, कलम ९ द्वारे "ज्यांमधून कायमची अंशतः निःसमर्थता निष्पन्न झाली असे मानले जाते अशा इजांची यादी" याऐवजी घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे जादा दाखल केले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ अनुक्रमांक ७ ते ५४ यांना १ ते ४८ हे नवीन अनुक्रमांक दिले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

५. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १४(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

६. वरील अधिनियमाच्या कलम १४(दोन) द्वारे घातले.

| अनुक्रमांक | इजेचे वर्णन | अर्थार्जनक्षमतेच्या हानीची टक्केवारी |
|---|---|---|
| १५ | बोटांच्या पेरांमधील पहिल्या सांध्याच्या पलिकडे दोन्ही पावलांची सर्व बोटे कापावी लागणे. | २० |
| १६ | नितंबातून कापावे लागणे .. .. .. .. | ९० |
| १७ | महा उर्विकाकूटाच्या टोकापासून मोजल्यानंतर जास्तीत जास्त [1][१२.७० सें.मी.] इतपत खुंट उरेल अशाप्रकारे नितंबाखाली कापावे लागणे. | ८० |
| १८ | महा उर्विकाकूटाच्या टोकापासून मोजल्यानंतर [1][१२.७०] सें.मी. पेक्षा अधिक पण मांडीच्या मध्यापलीकडे नाही इतपत खुंट उरेल अशाप्रकारे नितंबाखाली कापावे लागणे. | ७० |
| १९ | मांडीच्या मध्यापासून गुडघ्याखाली [1][८.८९] सें.मी. पर्यंत कापावे लागणे .. | ६० |
| २० | गुडघ्याखाली [1][८.८९ सें.मी.] पेक्षा अधिक पण [1][१२.७० सें.मी.] पेक्षा अधिक नाही इतपत खुंट उरेल अशाप्रकारे कापावे लागणे. | ५० |
| २१ | गुडघ्याखाली [1][१२.७० सें.मी.] पेक्षा अधिक खुंट उरेल इतपत कापावे लागणे | [2][५०] |
| २२ | टाच उरेल इतपत एक पाऊल कापावे लागणे .. .. | [2][५०] |
| २३ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्याच्या अलिकडे एका पावलातून कापावे लागणे | [2][५०] |
| २४ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्यामधून एका पावलाची सर्व बोटे गमावणे | २० |
| | **अन्य इजा** | |
| २५ | विक्षतिसंकर न होता, एक डोळा गमावला जाऊन दुसरा डोळा शाबूत राहणे .. | ४० |
| २६ | विक्षतिसंकर न होता किंवा बुबुळ विद्रूप न होता, एका डोळयाची दृष्टी जाऊन दुसरा डोळा शाबूत राहणे. | ३० |
| [3][२६क | एका डोळयाची अंशत: दृष्टी जाणे .. .. .. | १०] |
| | **क.—उजव्या किंवा डाव्या पंजाची बोटे गमावणे** | |
| | **तर्जनी** | |
| २७ | संपूर्ण .. .. .. .. .. | १४ |
| २८ | दोन पेरांची हाडे .. .. .. .. | ११ |
| २९ | एका पेराचे हाड .. .. .. .. | ९ |
| ३० | हाड न गमवता टोक गिलोटिनने छाटावे लागणे .. .. | ५ |
| | **मधले बोट** | |
| ३१ | संपूर्ण .. .. .. .. | १२ |
| ३२ | दोन पेरांची हाडे .. .. .. .. | ९ |
| ३३ | एका पेराचे हाड .. .. .. | ७ |
| ३४ | हाड न गमावता टोक गिलोटिनने छाटावे लागणे .. .. | ४ |
| | **करंगळी** | |
| ३५ | संपूर्ण .. .. .. .. .. | ७ |
| ३६ | दोन पेरांची हाडे गमावणे .. .. .. .. | ६ |
| ३७ | एका पेराचे हाड गमावणे .. .. .. .. | ५ |
| ३८ | हाड न गमावता टोक गिलोटिनने छाटावे लागणे .. .. | २ |
| | **ख.—उजव्या किंवा डाव्या पावलाची बोटे गमावणे** | |
| | **अंगठा** | |
| ३९ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्यामधून .. .. .. | १४ |
| ४० | काही भाग हाडाची काहीशी हानी होऊन .. .. .. | ३ |
| | **अन्य कोणतेही बोट** | |
| ४१ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्यामधून .. .. .. | ३ |
| ४२ | काही भाग हाडाची काहीशी हानी होऊन .. .. .. | १ |
| | **एका पावलाची दोन बोटे—अंगठा वगळून** | |
| ४३ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्यामधून .. .. | ५ |
| ४४ | काही भाग हाडाची काहीशी हानी होऊन .. .. | २ |

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १४ (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम १४ (तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम १४ (चार) द्वारे घातले.

| अनुक्रमांक | इजेचे वर्णन | अर्थार्जनक्षमतेच्या हानीची टक्केवारी |
|---|---|---|
| | **एका पावलाची तीन बोटे—अंगठा वगळून** | |
| ४५ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्यामधून .. .. .. | ६ |
| ४६ | काही भाग हाडाची काहीशी हानी होऊन .. .. .. | ३ |
| | **एका पावलाची चार बोटे—अंगठा वगळून** | |
| ४७ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्यामधून .. .. .. | ९ |
| ४८ | काही भाग हाडाची काहीशी हानी होऊन .. .. .. | ३ ] |

[1][**टीप.**—या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही गात्राचा किंवा अवयवाचा उपयोग संपूर्णपणे व कायमचा गमावणे म्हणजे ते गात्र किंवा तो अवयव गमावण्यासारखेच आहे, असे मानण्यात येईल.]

## अनुसूची दुसरी

[कलम २(१) (ढ) पहा]

कलम २(१) (ढ) यांच्या उपबंधांच्या अधीनतेने ज्यांचा "कामगार" या शब्दाच्या व्याख्येत समावेश केला आहे अशा व्यक्तींची यादी.

पुढील व्यक्ती कलम २(१) (ढ) च्या अर्थानुसार कामगार आहेत आणि त्या कलमाच्या उपबंधास अधीन आहेत, म्हणजेच जी कोणतीही व्यक्ती—

[2][[3][(एक) लिपिकाचे पद किंवा रेल्वे सोडून अन्यत्र, लिफ्ट अथवा वाफेवर किंवा अन्य यांत्रिक शक्तीने किंवा विजेवर चालणारे वाहन चालवणे, [4][दुरुस्त करणे] किंवा त्याची देखभाल करणे यासंबंधात अगर अशा कोणत्याही वाहनात माल चढविणे किंवा त्यातून उतरवणे यासंबंधात कामावर लावलेली असेल, ती व्यक्ती; किंवा

(दोन) जर एखाद्या वास्तूमध्ये किंवा तिच्या प्रसीमेत 'कारखाना अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३) कलम २, खंड (ट) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे निर्मिति-प्रक्रिया चालवली जात असून तेथे अथवा अशा कोणत्याही निर्मिती प्रक्रियेशी आनुषंगिक किंवा तिच्याशी अगर तयार केल्या जाणाऱ्या वस्तूशी संबंधित असलेल्या एखाद्या कामी [5][—मग अशा कोणत्याही कामातील रोजगार अशा वास्तूमध्ये किंवा तिच्या प्रसीमेत चाललेला असो वा नसो.—]वाफ, पाणी किंवा अन्य यांत्रिक शक्ती किंवा विद्युत शक्ती वापरली जात असेल तर, अशा ठिकाणी लिपिकाचे पद सोडून अन्यत्र कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(तीन) कोणतीही वस्तू किंवा वस्तूचा भाग तयार करणे, त्यात फेरफार करणे, दुरुस्ती करणे, तो सजविणे, त्यावर शेवटचा हात फिरवणे किंवा त्याचा वापर, परिवहन किंवा विक्री या दृष्टीने त्यात अनुकूल बदल करून घेणे यासाठी ज्या वास्तूमध्ये किंवा जिच्या प्रसीमेत याप्रमाणे वीस किंवा त्याहून अधिक व्यक्ती कामावर लावलेल्या असतील अशा कोणत्याही वास्तूत कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; [6]* * *

[7][**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनांसाठी, अशा वास्तूच्या किंवा प्रसीमांच्या बाहेर, परंतु कोणतीही वस्तू किंवा वस्तूचा भाग तयार करणे, त्यात फेरफार करणे, दुरुस्ती करणे, तो सजविणे, त्यावर शेवटचा हात फिरविणे किंवा त्याचा वापर, परिवहन किंवा विक्री या दृष्टीने त्यात अनुकूल बदल करून घेणे यासंबंधीच्या कामाशी आनुषंगिक किंवा संबंधित अशा कोणत्याही कामावर लावलेल्या व्यक्ती ह्या, अशा वास्तूत किंवा प्रसीमांमध्ये कामावर लावलेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल; किंवा]

(चार) नियोक्त्याचा उदीम किंवा धंदा याच्याशी संबंधित असे स्फोटक पदार्थ निर्माण करणे किंवा हाताळणे अशा कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

---

१. १९६० चा अधिनियम ५८, कलम ३ व दुसरी अनुसूची यांद्वारे जादा दाखल केले.
२. १९३३ चा अधिनियम १५, कलम २ द्वारे पूर्वीचे खंड (एक) ते (तेरा) यांऐवजी घातले.
३. १९५९ चा अधिनियम ८, कलम १८ द्वारे खंड (एक) ते (नऊ) यांऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).
४. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १५(एक) द्वारे घातले.
५. १९६२ चा अधिनियम ६४, कलम १० द्वारे घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).
६. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे "किंवा" हा शब्द गाळला (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).
७. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे खंड (तीन) नंतर स्पष्टीकरण घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

(पाच) 'खाण अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५) कलम २, खंड(ज्) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही खाणीमध्ये, कोणत्याही खाणकामावर अथवा कोणतेही खाणकाम किंवा मिळवलेले खनिज याच्याशी आनुषंगिक अशा किंवा संबंधित अशा, लिपिकाचे पद सोडून अन्य कोणत्याही प्रकारच्या कामावर किंवा जमिनीखाली कोणत्याही प्रकारच्या कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(सहा) (क्) जे जहाज संपूर्णत: किंवा अंशत: वाफेवर किंवा अन्य यांत्रिक शक्तीवर किंवा विजेवर चालते किंवा जे अशा रीतीने चालवण्यात येणाऱ्या जहाजाच्या सहाय्याने खेचण्यात येते किंवा खेचले जाण्याचे उद्देशित असते अशा कोणत्याही जहाजाचा ; किंवा

(ख्) उपखंड (क्) मध्ये समाविष्ट न केलेले जे जहाज निव्वळ पंचवीस हजार किलोग्राम किंवा त्याहून अधिक वहनभाराचे असेल अशा कोणत्याही जहाजाचा; किंवा

(ग्) उपखंड (क्) किंवा उपखंड (ख्) मध्ये समाविष्ट न केलेल्या जहाजाला नुसत्या शिडानिशी जलप्रवास करण्यास पुरेसे क्षेत्र उपलब्ध आहे अशा कोणत्याही दर्यालायक जहाजाचा,

— नौकाधिपती किंवा खलाशी म्हणून कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(सात) (क्) ती, ज्या जहाजाची नौकाधिपती किंवा नाविकगणाचा सदस्य नाही अशा कोणत्याही जहाजात माल चढवणे किंवा त्यातून उतरवणे, त्यात इंधन घालणे, त्याची बांधणी करणे, त्याची दुरुस्ती करणे, त्याची मोडतोड करून टाकणे, त्याची साफसफाई करणे किंवा त्याला रंगरंगोटी करणे, अथवा कोणत्याही जलयानातून जो माल काढलेला आहे किंवा जो माल त्यात भरावयाचा आहे अशा मालाची [1][बंदरे अधिनियम, १९०८' (१९०८ चा १५) किंवा मोठे बंदर विश्वस्तमंडळ अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८)] याला अधीन असलेल्या कोणत्याही बंदराच्या सीमांमध्ये व्यवस्था पाहणे किंवा त्याची वाहतूक करणे; किंवा

(ख्) कोंडीतून एखादे जहाज दोरखंडाने ओढून काढणे; किंवा

(ग्) बंदराच्या भिंतीवरील नांगरवाडा किंवा धक्का यांच्यालगत जहाज खुंटवणे किंवा खुंटवलेली जहाजे तेथून बाहेर काढणे ;

(घ्) सुक्या गोदीत जलयाने प्रवेश करत असताना किंवा त्यातून बाहेर पडताना सुक्या गोदीचे कुसूल काढून टाकणे किंवा पुन्हा बसविणे; किंवा

(ङ्) संकटाच्या वेळी कोणतेही जलयान गोदीमध्ये आणणे किंवा गोदीतून बाहेर काढणे; किंवा

(च्) पलास करण्याच्या काथ्याच्या स्प्रिंगा आणि संरोधक तारा तयार करणे, कोंडीच्या दरवाजांवर पाण्याची खोली दर्शवणाऱ्या खुणा रंगवणे, आवश्यक तेव्हा तेव्हा डफरे काढून टाकणे किंवा पुन्हा बसविणे, मार्गिका जमिनीला लावणे, प्राणरक्षक बोये प्रमाणाबरहुकूम राखणे किंवा तशाच स्वरूपाचे अन्य कोणतेही देखभालविषयक काम करणे; किंवा

(छ्) जहाजाचा दोरखंड मालधक्क्याकडे आणण्यासाठी डोंग्यांवरील कोणतेही काम करणे, यासाठी कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(आठ) (क्) जमिनीपासून एका मजल्याहून अधिक उंचीची व्हावी अशा प्रकारे जिची रचना केली आहे किंवा तितकी उंच आहे किंवा होती अथवा जमिनीच्या पातळीपासून छपराच्या माथ्यापर्यंत ३६,५७६ मीटर इतक्या किंवा त्याहून अधिक उंचीची असेल अशी कोणतीही इमारत; किंवा

(ख्) ज्याची सर्वात खालच्या टोकापासून सर्वात वरच्या टोकापर्यंतची उंची ३६,५७६ मीटर किंवा त्याहून अधिक असेल असे कोणतेही धरण किंवा बंधारा; किंवा

(ग्) कोणताही रस्ता, पूल, बोगदा किंवा कालवा; किंवा

(घ्) कोणताही मालधक्का, मालकट्टा, समुद्रतट किंवा कोणतीही खुंटवणी धरून अन्य सागरी बांधकाम,

— यांचे बांधकाम, देखभाल दुरुस्ती करणे किंवा ते पाडून टाकणे या कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(नऊ) कोणत्याही तारयंत्राच्या किंवा दूरध्वनीच्या तारा किंवा खांब किंवा विजेची कोणतीही उंचावरील तार किंवा केबल किंवा खांब किंवा उभा टेकू किंवा त्याकरता लागणारी जोडसामग्री आणि खिळणसामग्री उभारणे, त्यांची देखभाल करणे, त्यांची दुरुस्ती करणे किंवा ती खाली उतरवणे या कामी लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा]

(दहा) कोणताही हवेतील रज्जुमार्ग, कालवा, नळमार्ग किंवा मलप्रणाल यांचे बांधकाम करणे, त्याचे काम चालवणे, दुरुस्ती करणे किंवा ती नष्ट करणे यासाठी लिपिकाचे पद सोडून अन्यत्र कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(अकरा) कोणत्याही अग्निशामक दलाच्या सेवेमध्ये कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

---

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १५(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(बारा) [१]['रेल्वे अधिनियम, १८८९' (१८८९ चा २४) याचे कलम २ खंड (३१) व कलम १९७, पोटकलम (१)] यामध्ये व्याख्या केलेल्या अशा रेल्वे प्रशासनाबरोबर केलेली संविदा पूर्ण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीने प्रत्यक्ष किंवा उप संविदाकाराद्वारे कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(तेरा) रेल्वे डाक सेवेत निरीक्षक, डाक रक्षक, डाक विल्हेकार किंवा व्हॅन प्यून म्हणून [२][किंवा तारमास्तर किंवा डाक किंवा रेल्वे बावटेवाला म्हणून] कामाला लावलेली किंवा भारतीय डाक व तार विभागात सर्वसामान्यपणे बाहेरची कामे करावी लागतात अशा कोणत्याही व्यवसायात कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; ] किंवा

(चौदा) नैसर्गिक पेट्रोलियम किंवा नैसर्गिक गॅस मिळविण्यासाठी करावयाच्या कामासंबंधात लिपिकाचे पद सोडून अन्यत्र कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(पंधरा) सुरुंग लावण्याची कामे ज्यात अंतर्भूत आहेत अशा कोणत्याही व्यवसायात कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(सोळा) ज्या खोदकामामध्ये मागील बारा महिन्यांतील कोणत्याही एका दिवशी [३][पंचवीस] पेक्षा अधिक व्यक्ती कामावर लावलेल्या असतील किंवा स्फोटक पदार्थांचा वापर केला असेल किंवा त्या खोदकामाच्या सर्वात वरच्या टोकापासून सर्वात खालच्या टोकापर्यंतची खोली [४][३६,५७६ मीटर] हून अधिक होत असेल असे कोणतेही खोदकाम करण्यासाठी कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(सतरा) दहापेक्षा अधिक उतारू वाहून नेऊ शकणारी एखादी तरी चालवण्याच्या कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा

(अठरा) जी जमीन [५][वेलदोडा], सिंकोना, कॉफी, व रबर किंवा चहा यांची लागवड करण्याच्या प्रयोजनार्थ राखलेली असून जिच्यावर मागील १२ महिन्यांत पंचवीस किंवा त्याहून अधिक व्यक्ती अशा प्रकारे कामावर लावण्यात आल्या असतील अशा कोणत्याही जमिनीवर लिपिकाचे पद सोडून अन्यत्र कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा

[६][(एकोणीस) विद्युत शक्तीची निर्मिती करणे, ती रुपांतरित करणे, ती पारेषित करणे किंवा तिचे वितरण करणे किंवा गॅसची निर्मिती करणे किंवा त्याचा पुरवठा करणे या कामी, लिपिकाचे पद सोडून अन्यत्र कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा]

(वीस) 'भारतीय दीपगृह अधिनियम, १९२७' (१९२७ चा १७) याच्या कलम २ खंड (घ्) मध्ये व्याख्या केलेल्या अशा दीपगृहात कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा

(एकवीस) जनतेत प्रदर्शित करावयाची म्हणून उद्देशित असलेली चलच्चित्रकावरील चित्रे निर्माण करण्याच्या किंवा अशी चित्रे दाखविण्याच्या कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा

(बावीस) हत्ती किंवा वन्य प्राणी शिकवून तयार करणे, त्यांना पाळणे किंवा त्यांच्याकडून काम करून घेणे या कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा

[७][(तेवीस) ताडवृक्षांना खाप लावणे किंवा झाडे तोडणे किंवा त्यांचे ओंडके करणे, किंवा अंतर्देशीय जलधीमधून इमारती लाकडाची वाहतूक करणे किंवा वणवे आटोक्यात आणणे किंवा ते विझवणे या कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(चोवीस) हत्ती किंवा वन्य प्राणी पकडण्याच्या किंवा त्यांची शिकार करण्याच्या मोहिमेत कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा]

[८][(पंचवीस)] पाणबुड्या म्हणून कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; [९][किंवा

(सव्वीस) (क) जेथे माल साठवलेला असेल, आणि जेथे मागील बारा महिन्यांतील कोणत्याही एखाद्या दिवशी अशाप्रकारे दहा किंवा त्याहून अधिक व्यक्ती कामावर लावलेल्या असतील अशी कोणतीही वखार किंवा अन्य जागा ; किंवा

---

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १५ (तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. १९५९ चा अधिनियम ८, कलम १८ द्वारे घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे "पन्नास" या शब्दाऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे 'वीस फूट' या ऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

५. १९६२ चा अधिनियम ६४, कलम १० द्वारे घातले (१ फेब्रुवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

६. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १५ (चार) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

७. १९३८ चा अधिनियम ९, कलम ११ द्वारे घातले.

८. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ खंड (तेवीस) याला (पंचवीस) असा नवीन क्रमांक दिला.

९. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे घातले.

(ख). जेथे मागील बारा महिन्यांतील कोणत्याही एका दिवशी अशाप्रकारे [1][पन्नास] किंवा त्याहून अधिक व्यक्ती कामावर लावलेल्या असतील अशी कोणतीही बाजारपेठ,

—यामध्ये किंवा त्यांच्या प्रसीमांमध्ये मालाची व्यवस्था किंवा वाहतूक करण्याच्या कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(सत्तावीस) ज्यामध्ये रेडियम किंवा क्ष-किरण उपकरणसंच हाताळावे आणि चालवावे लागतात व किरणोत्सारी पदार्थांशी संपर्क ठेवावा लागतो अशा कोणत्याही व्यवसायामध्ये कामावर लावलेली असेल ती व्यक्ती; ] [2][किंवा

(अठ्ठावीस) 'भारतीय वायुयान अधिनियम, १९३४' (१९३४ चा २२) कलम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, वायुयानाची बांधणी करणे, उभारणी करणे, ते मोडणे, चालवणे किंवा त्याची देखभाल करणे या कामी किंवा यासंबंधात कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा

(एकोणतीस) वाफेवर किंवा अन्य यांत्रिक शक्तीने किंवा विजेवर चालणारी कर्षित्रे किंवा अन्य यंत्रके यांच्या सहाय्याने [3][उद्यानविषयक, वनशास्त्रीय, मधुमक्षिकापालन किंवा शेती करण्याच्या कामावर] लावलेली असेल ती व्यक्ती; किंवा

(तीस) नलिका-कूप बांधणे, त्याचे काम चालवणे, दुरुस्ती करणे किंवा देखभाल करणे यासाठी लिपिकाचे पद सोडून अन्यत्र कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा

(एकतीस) कोणत्याही इमारतीतील विद्युतजोडसामग्रीची देखभाल, तिची दुरुस्ती किंवा ती बदलून नवीन बसवणे या कामावर लावलेली असेल ती व्यक्ती ; किंवा

(बत्तीस) सर्कशीमध्ये कामावर लावलेली असेल ती व्यक्ती.]

[4][(तेहतीस) कोणत्याही कारखान्यात किंवा व्यापारी संस्थेत पहारेकरी म्हणून कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती; किंवा

(चौतीस) समुद्रात मासेमारीच्या कोणत्याही कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती; किंवा

(पस्तीस) सर्पविष काढण्यासाठी साप हाताळावे लागणाऱ्या कामासाठी किंवा साप किंवा अन्य कोणत्याही विषारी प्राणी किंवा कीटक यांवर देखरेख ठेवण्याच्या कोणत्याही कामासाठी कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती; किंवा

(छत्तीस) घोडे, खेचर आणि बैल यांसारख्या प्राण्यांना हाताळावे लागणाऱ्या कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती; किंवा

(सदतीस) यांत्रिकरीत्या चालवण्यात येणाऱ्या कोणत्याही वाहनावर माल भरण्यासाठी किंवा माल उतरविण्यासाठी किंवा अशा वाहनात जो माल भरलेला असेल तो माल हाताळावा लागणाऱ्या कामावर किंवा त्याची वाहतूक करण्यासाठी कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती; किंवा

(अडतीस) स्थानिक अधिकारितेच्या प्रसीमांच्या अंतर्गत येणाऱ्या मलप्रणाल किंवा मलकुंडाच्या स्वच्छतेच्या कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती; किंवा

(एकोणचाळीस) नद्यांचे सर्वेक्षण आणि अन्वेषण, समन्वेषण किंवा मापन किंवा अभीक्षण करण्याच्या कामात, वेधन प्रक्रिया, जलशास्त्रीय अभीक्षण आणि पुराचे भाकित वर्तवण्याच्या कामाचा, भूजल सर्वेक्षण व समन्वेषण यांचा अंतर्भाव असणाऱ्या कामांवर लावलेल्या व्यक्ती; किंवा

(चाळीस) जंगलांच्या स्वच्छतेच्या किंवा जमीन किंवा तळी वापरण्यायोग्य करण्यासाठी बारा महिने चालू असणाऱ्या कामावर, कोणत्याही एका दिवशी पंचवीस व्यक्तींहून अधिक लावलेल्या व्यक्ती ; किंवा

(एकेचाळीस) जमीन कसण्याच्या किंवा पशुधनाचे परिपालन किंवा पालन करण्याच्या किंवा वनातील कामे करण्याच्या किंवा मासेमारी करण्याच्या बारा महिने चालणाऱ्या कामावर कोणत्याही एका दिवशी पंचवीस व्यक्तींहून अधिक लावलेल्या कोणत्याही व्यक्ती ; किंवा

(बेचाळीस) विहिरी, नलिका-कूप, तळी, सरोवरे, झरे आणि तत्सम पाणी वर खेचून घेण्यासाठी वापरात आणल्या जाणाऱ्या पंप साधन सामग्रीच्या प्रतिष्ठापनाच्या, परिरक्षेच्या किंवा दुरुस्तीच्या कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्ती ; किंवा

(त्रेचाळीस) उघडी विहीर किंवा खोदलेली विहीर, विंधणविहीर, विंधण-नि-खोदलेली विहीर, पाझर स्थान यांच्या बांधकामाच्या, खोदकामाच्या किंवा ती खोल करण्याच्या कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्ती; किंवा

---

१. १९५९ चा अधिनियम ८, कलम ८ द्वारे "शंभर" या शब्दाऐवजी घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे घातले (१ जून, १९५९ रोजी व तेव्हापासून).

३. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १५(पाच) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १५ (सहा) द्वारे घातले.

(चव्वेचाळीस) कृषिविषयक कामात किंवा लागवडीत कीटकनाशके किंवा कीटनाशके यांच्या फवारणीच्या आणि भुकटी फवारणीच्या कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्ती ; किंवा

(पंचेचाळीस) यांत्रिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या कापणी किंवा मळणी या कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्ती ; किंवा

(सेहेचाळीस) बलीवर्द यंत्रे, कर्षित्रे चालवण्याच्या, वीजेच्या साह्याने शेती करण्याच्या आणि तत्सम कामावर लावलेल्या किंवा त्यांच्या दुरुस्तीच्या कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्ती ; किंवा

(सत्तेचाळीस) जमिनीपासून ३.६६ मीटर्स किंवा त्याहून अधिक उंचीवरील जाहिरात फलकावर चित्र रंगविण्यासाठी चित्रकार म्हणून कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्ती ; किंवा

(अठ्ठेचाळीस) श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५ (१९५५ चा ४५) यात दिल्याप्रमाणे कोणत्याही वृत्तपत्राच्या आस्थापनेत कामावर लावलेल्या आणि बाह्य कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्ती ;

**स्पष्टीकरण.**—या अनुसूचीत कोणत्याही विशिष्ट प्रकरणी " मागील बारा महिने " या शब्दप्रयोगाचा संबंध अशा प्रकरणी ज्यादिवशी अपघात घडला त्यादिवशी संपणाऱ्या बारा महिन्यांच्या कालावधीशी आहे.]

[1] [अनुसूची तिसरी

(कलम ३ पहा)

**व्यवसायजन्य रोगांची सूची**

| अनुक्रमांक (१) | व्यवसायजन्य रोग (२) | कामधंदा (३) |
|---|---|---|
| | **भाग—क** | |
| १ | व्यवसायात ज्याची लागण होण्याचा खास करून धोका असतो असे संक्रामक आणि परजीवी रोग. | (क) आरोग्यास धोका पोहचवणारे सर्व प्रकारचे काम किंवा प्रयोगशाळेतील काम.<br>(ख) पशुवैद्यकीय कामाचा संबंध येणारे काम.<br>(ग) प्राणी, प्राण्याचे शव, त्या शवाचे भाग किंवा प्राण्यामुळे किंवा प्राण्याच्या शवामुळे जो दूषित झालेला आहे असा व्यापारी माल यांच्या हाताळणी संबंधातील काम.<br>(घ) दूषित होण्याचा विशिष्ट धोका असलेले इतर काम. |
| २ | संपीडित वायुमध्ये काम केल्याने होणारे रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ३ | शिसे किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ४ | नायट्रस धुरामुळे होणारी विषबाधा. .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ५ | कार्बनी फॉस्फरसाच्या संयुगामुळे होणारी विषबाधा. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| | **भाग—ख** | |
| १ | फॉस्फरस किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २ | पारा किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ३ | बेन्झीन किंवा त्याच्या विषारी समजातीय पदार्थामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ४ | बेन्झीन किंवा त्याचे समजातीय यांच्यापासून निघणाऱ्या विषारी नायट्रो व अमिडो पदार्थामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |

१. १९८४ चा अधिनियम २२, कलम ६ द्वारे मूळ अनुसूची तीन ऐवजी घातले. (१ जुलै, १९८४ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | **भाग—ख** | |
| ५ | क्रोमिअम किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ६ | आर्सेनिक किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ७ | किरणोत्सारी पदार्थ आणि आयनकारी प्रारण यामुळे होणारे रोग. | किरणोत्सारी पदार्थांची प्रक्रिया किंवा आयनकारी प्रारण किंवा संपर्कात आणणारे सर्व काम. |
| ८ | डांबर, खडचाडांबर, बिटूमेन, खनिजतेल, अँन्थ्रासिन किंवा संयुगे या पदार्थांपासून उत्पादित होणारे पदार्थ व त्यांचे अवशेष यामुळे होणारा बाह्यत्वचा ग्रंथीचा प्रथमावस्थेतील कर्करोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ९ | (अॅलिफॅटिक अॅन्ड्रोमॅटिक सिरीजच्या) हायड्रो-कार्बनचे विषारी हॅलोजनसाधित पदार्थ यामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १० | कार्बनडायसल्फाईड (द्विगंधिल) मुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ११ | इन्फ्रारेड किरणोत्सर्गामुळे होणारा व्यवसायजन्य मोतीबिंदू. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १२ | मॅंगेनीज किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १३ | अन्यबाबीमध्ये अंतर्भूत नसलेले भौतिक, रासायनिक किंवा जीवशास्त्रीयकारक यांमुळे होणारे त्वचारोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १४ | गोंगाटामुळे श्रवणशक्तीला हानी पोहोचणे. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १५ | डायनायट्रोफिनॉल किंवा समजातीयामुळे किंवा डायनायट्रोफिनॉलच्या ऐवजी वापरलेल्या पदार्थामुळे किंवा अशा पदार्थांच्या क्षारामुळे विषबाधा. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १६ | बेरिलियम किंवा त्याच्या संयुगामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १७ | कॅडमियम किंवा त्याच्या संयुगामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १८ | कामाच्या प्रक्रियेमध्ये अंतर्भूत असलेल्या मान्यता-प्राप्त संवेदनक्षम कारणांमुळे होणारा व्यवसायजन्य दमा. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १९ | फ्लुओरिन किंवा त्याच्या संयुगामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २० | नायट्रोग्लिसरीन किंवा इतर नायट्रोअॅसीड एस्टर-मुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २१ | अल्कोहोलस आणि कीटोनसमुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २२ | कार्बनमोनॉक्साईड आणि त्याचे विषारी साधित पदार्थ, हायड्रोजन सल्फाइड या श्वासावरोधकामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २३ | अॅस्बेस्टॉसमुळे होणारा फुफ्फुसाचा कर्करोग आणि मेसोथेलिओमस. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २४ | मूत्राशय किंवा मूत्रपिंड किंवा मूत्रवाहिनी यांच्या बाह्यआवरणाला होणारा प्राथमिक अवस्थेचा निओप्लाझम (अर्बुद). | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| [१][ २५ | हिमाच्छादित क्षेत्रात येणारी हिमान्धता. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २६ | अतिउष्ण हवामानामुळे होणारा रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २७ | अति थंड हवामानामुळे होणारा रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. ] |

१. १९९५ चा अधिनियम ३०, कलम १६ द्वारे घातले.

**अनुसूची तिसरी—समाप्त**

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | भाग—ग | |
| १ | स्क्लोरोजेनिक खनिज भुकटी (सिलीकॉसिस्, ॲन्थ्राओसिलीकॉसिस्, ॲस्बेस्टॉसिस्) यामुळे होणारा न्युमोकॉनिऑसिस आणि सिलिकोटयूबर-क्युलोसिस मात्र सिलीकॉसिस हा घटक, असमर्थता निर्माण करण्यात किंवा मृत्यू घडून येण्यात अपरिहार्य घटक असावयास हवा. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २ | बॅगॅसॉसिस. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ३ | कापूस, लवचिक ताग आणि सिसल भुकटी (बायसिऑनसीस) यामुळे होणारा ब्रॉन्कोपलमनरी रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ४ | कार्बन भुकटीच्या श्वसनामुळे होणारा एक्सट्रीन्सीक ॲलर्जीक ॲल्वीलीटीस रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ५ | कठीण धातूंपासून होणारा ब्रॉन्कोपलमनरी रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम.] |

## [1][ अनुसूची चौथी

(कलम ४ पहा)

कायमची निःसमर्थता आणि मृत्यू झाल्याच्या प्रकरणी भरपाईच्या रकमेचा हिशोब करण्यासाठी गुणक.

| कामगाराला भरपाई देय झाल्याच्या तारखेच्या लगतपूर्व त्याच्या शेवटच्या वाढदिवशी त्याच्या वयाची पूर्ण झालेली वर्षे (१) | गुणक (२) |
|---|---|
| १६ हून अधिक नाही .. .. .. .. | २२८.५४ |
| १७ हून अधिक नाही .. .. .. .. | २२७.४९ |
| १८ हून अधिक नाही .. .. .. .. | २२६.३८ |
| १९ हून अधिक नाही .. .. .. .. | २२५.२२ |
| २० हून अधिक नाही .. .. .. .. | २२४.०० |
| २१ हून अधिक नाही .. .. .. .. | २२२.७१ |
| २२ हून अधिक नाही .. .. .. .. | २२१.३७ |
| २३ हून अधिक नाही .. .. .. .. | २१९.९५ |
| २४ हून अधिक नाही .. .. .. .. | २१८.४७ |
| २५ हून अधिक नाही .. .. .. .. | २१६.९१ |
| २६ हून अधिक नाही .. .. .. .. | २१५.२८ |
| २७ हून अधिक नाही .. .. .. .. | २१३.५७ |
| २८ हून अधिक नाही .. .. .. .. | २११.७९ |
| २९ हून अधिक नाही .. .. .. .. | २०९.९२ |
| ३० हून अधिक नाही .. .. .. .. | २०७.९८ |
| ३१ हून अधिक नाही .. .. .. .. | २०५.९५ |
| ३२ हून अधिक नाही .. .. .. .. | २०३.८५ |

१. १९८४ चा अधिनियम २२, कलम ७ द्वारे मूळ अनुसूची चार ऐवजी घातले (१ जुलै, १९८४ रोजी व तेव्हापासून).

अनुसूची चौथी—चालू

| (१) | (२) |
| --- | --- |
| ३३ हून अधिक नाही .. .. .. .. | २०१.६६ |
| ३४ हून अधिक नाही .. .. .. .. | १९९.४० |
| ३५ हून अधिक नाही .. .. .. .. | १९७.०६ |
| ३६ हून अधिक नाही .. .. .. .. | १९४.६४ |
| ३७ हून अधिक नाही .. .. .. .. | १९२.१४ |
| ३८ हून अधिक नाही .. .. .. .. | १८९.५६ |
| ३९ हून अधिक नाही .. .. .. .. | १८६.९० |
| ४० हून अधिक नाही .. .. .. .. | १८४.१७ |
| ४१ हून अधिक नाही .. .. .. .. | १८१.३७ |
| ४२ हून अधिक नाही .. .. .. .. | १७८.४९ |
| ४३ हून अधिक नाही .. .. .. .. | १७५.५४ |
| ४४ हून अधिक नाही .. .. .. .. | १७२.५२ |
| ४५ हून अधिक नाही .. .. .. .. | १६९.४४ |
| ४६ हून अधिक नाही .. .. .. .. | १६६.२९ |
| ४७ हून अधिक नाही .. .. .. .. | १६३.०७ |
| ४८ हून अधिक नाही .. .. .. .. | १५९.८० |
| ४९ हून अधिक नाही .. .. .. .. | १५६.४७ |
| ५० हून अधिक नाही .. .. .. .. | १५३.०९ |
| ५१ हून अधिक नाही .. .. .. .. | १४९.६७ |
| ५२ हून अधिक नाही .. .. .. .. | १४६.२० |
| ५३ हून अधिक नाही .. .. .. .. | १४२.६८ |
| ५४ हून अधिक नाही .. .. .. .. | १३९.१३ |
| ५५ हून अधिक नाही .. .. .. .. | १३५.५६ |
| ५६ हून अधिक नाही .. .. .. .. | १३१.९५ |
| ५७ हून अधिक नाही .. .. .. .. | १२८.३३ |
| ५८ हून अधिक नाही .. .. .. .. | १२४.७० |
| ५९ हून अधिक नाही .. .. .. .. | १२१.०५ |
| ६० हून अधिक नाही .. .. .. .. | ११७.४१ |
| ६१ हून अधिक नाही .. .. .. .. | ११३.७७ |
| ६२ हून अधिक नाही .. .. .. .. | ११०.१४ |
| ६३ हून अधिक नाही .. .. .. .. | १०६.५२ |
| ६४ हून अधिक नाही .. .. .. .. | १०२.९३ |
| ६५ हून अधिक .. .. .. .. | ९९.३७] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई